रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १६ ◆ अंक १९९
www.ramprahar.com

सोमवार, ५ फेब्रुवारी २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

पूनम पांडेविरोधात पोलिसांत तक्रार दाखल/२

दिव्यांग सक्षमीकरणासाठी राजिपचा पुढाकार/५

शिवाजीनगर क्रिकेट अकॅडमीचे उद्घाटन/८

## 'ओबीसी विद्यार्थ्यांसाठी ५४ नवीन वसतिगृहे उभारणार'



**नागपूर :** मध्यंतरी सरकार नसताना अनेक कामे थांबली होती, मात्र आता ओबीसी विद्यार्थ्यांसाठी येत्या दोन महिन्यांत ५४ नवीन वसतिगृहे सुरू करण्यात येणार आहेत. ज्या विद्यार्थ्यांना वसतिगृहात जागा मिळणार नाही त्यांच्यासाठी स्वयंसारख्या योजनेच्या माध्यमातून खात्यात पैसे जमा करू, जेणेकरून ते स्वतः खोली घेऊन भाड्याने राहू शकतील असा निर्णय घेणार असल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. ते रविवारी (दि.४) नागपूर झाडे कुणबी समाजाच्या वसतिगृह भूमिपूजन समारंभात बोलत होते. ओबीसी समाजाच्या आरक्षणाला कोणीही धक्का लावू शकत नाही. पूर्वी याला धक्का लावण्याची मुभा होती, पण पंतप्रधान नरेंद्र मोदींनी ओबीसी आयोग स्थापन करून त्याला संविधानिक दर्जा प्राप्त करून दिल्याने ओबीसीच्या आरक्षणाला कोणीही धक्का लावू शकत नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# भाजपचे शंखनाद २०२४ अभियान

## सोशल मीडिया पदाधिकाऱ्यांची पनवेलमध्ये कार्यशाळा

### नियुक्तीपत्रांचे वाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आगामी निवडणुका जिंकण्यासाठी भाजपने शंखनाद २०२४ अभियान सुरू केले आहे. भाजप यंदाही सोशल मीडियाचा प्रभावी वापर करून महाविकास आघाडी आणि इंडिया आघाडीला टक्कर देणार आहे. शंखनाद अभियानांतर्गत पनवेलमध्ये सोशल मीडिया पदाधिकाऱ्यांची कार्यशाळा रविवारी (दि.४) सोशल मीडिया सेलचे महाराष्ट्र प्रदेश संयोजक प्रकाश गाडे आणि भाजप मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत झाली.




भाजप उत्तर रायगड जिल्हा सोशल मीडिया आणि आयटी सेल यांच्यातर्फे शंखनाद अभियान कार्यशाळा पनवेल शहरातील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेस भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस नितीन पाटील, चारुशिला घरत, तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, महिला मोर्चा सोशल मीडिया प्रदेश सहसंयोजिका बिना गोगरी, सदस्य मोना अडवाणी, जिल्हा संयोजिका ॲड. गायत्री परांजपे, आयटी सेल जिल्हा संयोजक नितेश सोलंकी, सोशल मीडिया पनवेल शहर संयोजक प्रसाद हनुमंते, जिल्हा सदस्य राजेंद्र कदम यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

या वेळी प्रदेश संयोजक प्रकाश गाडे यांनी आगामी निवडणुकांमध्ये सोशल मीडिया सेलवर महत्त्वपूर्ण जबाबदारी असून, कशा प्रकारे काम करावे या विषयी मार्गदर्शन केले. आमदार प्रशांत ठाकूर आणि जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनीही मार्गदर्शनपर विचार मांडत सरकारची कामे सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहचवण्यासाठी सोशल मीडियाचा प्रभावी वापर करा, असे आवाहन केले. या कार्यशाळेत नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना मान्यवरांच्या हस्ते नियुक्तीपत्रांचे वाटप करण्यात आले.

# देशात तिसऱ्यांदा मोदींना पंतप्रधानपदाची संधी मिळेल असे वातावरण

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे प्रतिपादन



**बारामती : प्रतिनिधी**

देशात तिसऱ्यांदा नरेंद्र मोदी यांना पंतप्रधानपदाची तिसऱ्यांदा संधी मिळेल असेच वातावरण आहे, कारण त्यांच्याकडे 'व्हीजन' आहे. संपूर्ण जगात त्यांची वेगळी प्रतिमा आहे आणि त्यांच्यामुळे आपल्या देशाला महत्त्व प्राप्त झाले आहे, अशा शब्दांत त्यांच्या नेतृत्वावर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्तुतीसुमने उधळली आहेत. बारामती येथे रविवारी (दि.४) आयोजित मेळाव्यात उपमुख्यमंत्र्यांनी लोकसभा निवडणुकीचे रणशिंग फुंकले.

बारामती व्यापारी महासंघाचा मेळावा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत झाला. या वेळी त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्व व कार्याचा गौरव केला. ते म्हणाले, पंतप्रधान मोदींनी देशात वेगवेगळे राष्ट्रीय महामार्ग, फ्लायओव्हर, विमानतळ अशा खूप काही गोष्टी उभा केल्या. शेतकऱ्यांसह विविध घटकातील नागरिकांना अनेक योजनांच्या माध्यमातून मदतीचा हात दिला.

राज्यातील कारभाराबाबत बोलताना उपमुख्यमंत्री पवार यांनी सांगितले की, मध्यंतरी सव्वा वर्ष सरकारमध्ये नव्हतो. त्यामुळे कामे थांबली. सरकारमध्ये गेल्यानंतर थांबलेल्या कोट्यवधींच्या कामांना गती मिळाली.

उद्या खासदारकीचा उमेदवार दिल्यानंतर जर यदाकदाचित मला मिठाचा खडा लागला, तर आमदारकीबाबत वेगळा विचार करेन. कोणाच्या बापाचे ऐकणार नाही. मी सरळ सांगेन माझ्या शब्दाला साथ न मिळाल्यास काय उपयोग, असे सांगून कामाच्या पाठीशी उभा रहायचे की बारामतीच्या चाललेल्या विकासाला साथ द्यायची, विकासाला खिळ घालायची याचा निकाल बारामतीकरांनो तुम्हाला घ्यायचा आहे.

एनडीएत ४८ जागांपैकी कोणती जागा कोणाला द्यायची याबाबत वरीष्ठ पातळीवर निर्णय घेतला जाईल, मात्र आपण जी राजकीय भूमिका घेतली त्या पक्षाचा उमेदवार खासदारकीला इथ उभा करणार आहोत. त्यामुळे लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत वेगवेगळे विचारांच्या उमेदवाराला मतदान करण्याची दोन दगडींवर हात ठेवण्याची भूमिका मान्य नाही. द्यायचे असेल तर लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत माझ्याच उमेदवाराला मतदान करा. त्यामुळे विकासाची गती वाढेल, असा शब्द देतो, असेही उपमुख्यमंत्री पवार यांनी स्पष्ट केले.

## गॅस गळतीमुळे तिघांचा मृत्यू

**वसई : प्रतिनिधी**

वसईच्या माणिकपूर येथील एका इमारतीच्या बंद घरात रविवारी (दि. ४) तीन जणांचे मृतदेह आढळून आले. गॅस गळती झाल्यामुळे या तिघांचा मृत्यू झाला असल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी वर्तवला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार वसई पश्चिमेकडील माणिकपूर परिसरातील नौपाडा येथील आशा सदन नावाची दुमली इमारत आहे. रविवारी दुपारी या इमारतीमधून एका घरातून गॅसचा वास येऊ लागला. त्यामुळे शेजाऱ्यांनी पोलिसांना माहिती दिली. त्यानंतर पोलिसांनी घराचे दार तोडून उघडल्यानंतर तीन तरुणांचे मृतदेह आढळून आले. ते शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आले आहेत.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते शिवाजीनगर येथील जलकुंभाचे लोकार्पण






**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गव्हाण ग्रामपंचायतीच्या हद्दीतील शिवाजीनगर गावासाठी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अर्थसहाय्यातून जलकुंभ उभारण्यात आले आहे. या जलकुंभाचे उद्घाटन रविवारी (दि.४) लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते झाले.

या कार्यक्रमाला शिवाजीनगर ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष कृष्णाशेठ ठाकूर, न्हावे ग्रामपंचायतीचे सरपंच विजेंद्र पाटील, माजी सरपंच हरिश्चंद्र म्हात्रे, गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, वामन ठाकूर, तुळशीदास ठाकूर, पंढरीनाथ ठाकूर, गजानन ठाकूर, विजय ठाकूर, श्रीधर ठाकूर, भास्कर पाटील, सुहास ठाकूर, शिवाजी ठाकूर, नारायण ठाकूर, जगदीश ठाकूर, सुनील ठाकूर, सुरेश ठाकूर, रसिकलाल कनाडा, विष्णू कडू, तुकाराम मोकल, एकनाथ ठाकूर, दिलीप ठाकूर, हेमंत ठाकूर, सुरेश ठाकूर, प्रल्हाद ठाकूर, राजेंद्र ठाकूर, रतन ठाकूर, अमित कडू, जितेंद्र कडू, नंदा ठाकूर, कुसुम ठाकूर, शांताबाई ठाकूर, आशा म्हात्रे, मंजुळा कडू, रंजनी ठाकूर, सुचिता ठाकूर, सरस्वती ठाकूर, मालती ठाकूर, विमल कडू, सुरक्षा ठाकूर, साकुरबाई ठाकूर, विठाबाई पाटील आदी उपस्थित होते. **(पान २ वर..)**

## निवडक

### पाकिस्तानसाठी हेरगिरी करणाऱ्याला मेरठमधून अटक

**लखनऊ :** उत्तर प्रदेश दहशतवादविरोधी पथकाने पीएसआय या पाकिस्तानी गुप्तहेर संस्थेच्या एका गुप्तहेराला मेरठमधून अटक केली आहे. धक्कादायक बाब म्हणजे या गुप्तहेराने रशियाची राजधानी मॉस्कोमधील भारतीय दूतावासात काम केले होते. सत्येंद्र सिवल असे आरोपीचे नाव आहे.

### उत्तराखंड राज्यात समान नागरी कायद्याला मंजुरी

**डेहराडून :** उत्तराखंड कॅबिनेटने समान नागरी कायद्याला मंजुरी दिली आहे. निवृत्त नायाधीशांच्या समितीच्या शिफारशीनंतर उत्तराखंड सरकारने मंजुरी दिली. समान नागरी कायद्याला मंजुरी दिल्याने उत्तराखंड राज्य हा कायदा लागू होणारे देशातील पहिले राज्य ठरणार आहे.

## अलिबाग वेलवलीमध्ये बैलगाडी शर्यतीवर पोलिसांची कारवाई

### परवानगी न घेतल्याने आयोजकांवर गुन्हा दाखल

**रेवदंडा : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील बैलगाडी शर्यतीसाठी प्रसिद्ध असलेल्या वेलवली माती बंदर येथे झालेल्या बैलगाडी शर्यतीप्रकरणी आयोजक व स्पर्धेत सहभागी झालेल्या चालक व मालक यांच्यावर रेवदंडा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. त्यामुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

शासनाची कोणतीही परवानगी न घेता वेलवली माती बंदर येथे आयोजक व बेलोशी ग्रामस्थ मंडळ यांनी जिल्हाधिकारी यांच्या जमावबंदी आदेशाचे उल्लघंन करून ३१ जानेवारी रोजी सायंकाळी ४च्या सुमारास बैलगाडी शर्यतीचे आयोजन केले होते. या शर्यतीत १५ ते २० बैलगाडी चालक व मालक यांनी सहभागी होत त्यांच्या हातातील काठ्यांनी निर्दयीपणे बैलांच्या पाठीवर मारून तसेच त्यांच्या शेपट्या पिरगळून त्यांना पिडा व यातना देत अतोनात छळ केला, असे पोलिसांनी म्हटले आहे. याबाबत रेवदंडा पोलीस ठाण्यात भा.दं.वि. कलम १८८, मुंबई पोलीस अधिनियम १९५१चे कलम ११९,३७(१),(३), प्राण्यांना क्रुरतेने वागविण्यास प्रतिबंध १९६०,११ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी अधिक तपास सुरू आहे.

## सार्वजनिक मालमत्तेच्या नुकसानभरपाईनंतरच मिळणार जामीन

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करणाऱ्यांची आता गय केली जाणार नाही. सार्वजनिक मालमत्तेच्या नुकसान प्रकरणात झालेल्या नुकसानीच्या भरपाईची रक्कम जमा केल्यानंतरच आरोपींना जामीन दिला जावा, अशी शिफारस विधी आयोगाने केली आहे.

आयोगाचे अध्यक्ष जस्टिस ऋतूराज अवस्थी यांच्या अध्यक्षतेखालील समितीने रिपोर्टमध्ये म्हटले आहे की, सार्वजनिक संपत्तीच्या नुकसान प्रकरणात दोषसिद्धीची आणि शिक्षेची भीती पुरेशी नाही.

### कोकण रेल्वे प्रवाशांसाठी खूषखबर!

## दर रविवारी चिपळूण ते पनवेल आणि पनवेल ते रत्नागिरी अनारक्षित मेमू ट्रेन

**मुंबई : प्रतिनिधी**

कोकण रेल्वे मार्गावर प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी एक आनंदाची बातमी आहे. कोकण रेल्वेने दर रविवारी चिपळूण ते पनवेल आणि पनवेल ते रत्नागिरी अनारक्षित मेमू स्पेशल ट्रेन चालविण्याची घोषणा केली आहे. त्यामुळे मुंबई ते चिपळूण प्रवास करणाऱ्या प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे.



कोकण रेल्वेने दिलेल्या माहितीनुसार ट्रेन क्रमांक ०११५८ चिपळूण-पनवेल अनारक्षित स्पेशल मेमू ३१ मार्चपर्यंत दर रविवारी दुपारी ३ वाजून २५ मिनिटांनी सुटून त्याच दिवशी रात्री ८ वाजून १५ मिनिटांनी पनवेलला पोहचणार आहे. ट्रेन क्रमांक ०११५७ पनवेल-रत्नागिरी अनारक्षित स्पेशल मेमू १ मार्चपर्यंत दर रविवारी रात्री ८ वाजून २५ मिनिटांनी सुटून दुसऱ्या दिवशी पहाटे चार वाजता रत्नागिरीला पोहचणार आहे.

या गाड्यांना अंजनी, खेड, कळंबणी बुद्रुक, दिवाणखावटी, विन्हेरे, करंजाडी, सापे वामणे, वीर, गोरेगाव रोड, माणगाव, इंदापूर, कोलाड, रोहा, निडी, नागोठणे, कासू, पेण, हमरापूर, जिते, आपटा, रसायनी आणि सोमटणे स्थानकात थांबा दिला आहे. या अनारक्षित मेमू ८ डब्यांच्या असणार आहेत.

# पद्मदुर्गावर अवतरली शिवशाही!

## जागर कार्यक्रमात ढोल ताशाच्या गजरात निघाली पालखी

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड येथील पद्मदुर्ग या सागरी किल्ल्यात स्थानिक पद्मदुर्ग जागर संवर्धन समिती आणि कोकण कडा मित्र मंडळ महाड यांच्या संयुक्त विद्यमाने यंदाही पद्मदुर्ग जागर कार्यक्रम रविवारी (दि.४) मोठ्या उत्साहात झाला. या वेळी छत्रपती शिवाजी महाराज की जय, जय भवानी जय शिवाजी, हर हर महादेव अशा घोषणांनी किल्ला परिसर दणाणून गेला, तर शिवकालीन वेशभूषा करून मावळे हातात भाले व ढाल घेऊन गडावर होते. त्यामुळे येथे जणू शिवशाही अवतरल्याचे चित्र पहावयास मिळाले.

शिवरायांनी जंजिरा किल्ल्यावर करडी नजर ठेवण्यासाठी अरबी समुद्रात ऐतिहासिक पद्मदुर्ग हा किल्ला बांधला होता. मुरूड येथील पद्मदुर्ग जागर संवर्धन समिती व महाडचे कोकण कडा मित्र मंडळ यांनी १५ वर्षांपूर्वी जागर कार्यक्रम सुरू केला, जो दरवर्षी आयोजिला जातो. या पार्श्वभूमीवर समिती व मंडळाच्या मावळ्यांनी गडाची स्वच्छता केली होती. कार्यक्रमास शेकडोच्या संख्येने लोक किल्ल्यावर पोहचले. किल्ला परिसर फुलांनी सजवण्यात आला होता. **(पान २ वर..)**



# सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयाचे स्नेहसंमेलन उत्साहात; मान्यवरांची उपस्थिती



**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या उलवे नोड येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर सीबीएससी विद्यालयाचे दुसरे वार्षिक स्नेहसंमेलन शनिवारी (दि.३) उत्साहात साजरे झाले. या वेळी मान्यवरांनी विद्यार्थ्यांना गौरविले.

'रयत'चे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या स्नेहसंमेलनाला कामगार नेते महेंद्र घरत, आरटीओचे अधिकारी अनिल पाटील, भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, शकुंतला ठाकूर, सीबीएससी स्कूल कमिटी चेअरमन तथा पनवेल महापालिका माजी सभागृह नेते परेश ठाकूर, **(पान २ वर..)**



# संत निवृत्तीनाथ महाराजांच्या यात्रोत्सवासाठी वाहनांना टोलमाफी

## मुख्यमंत्र्यांची घोषणा; तयारीचा घेतला आढावा

**मुंबई : प्रतिनिधी**

संत परंपरेतील आद्यपीठ असलेले संत निवृत्तीनाथ महाराजांच्या पौषवारी यात्रोत्सवात येणाऱ्या भाविकांना सुखसुविधा देण्यासाठी संत निवृत्तीनाथ समाधी संस्थानास यापुढे कायमस्वरूपी निधी उपलब्ध करून देण्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. या वेळी त्यांनी यात्रौत्सवासाठी येणाऱ्या वारकऱ्यांची गैरसोय होऊ नये या दृष्टीने उपाययोजना कराव्यात तसेच वारकऱ्यांच्या वाहनांना स्टिकर पुरवून अशा वाहनांना टोलमाफी देण्याबाबत नियोजन करावे, अशा सूचनाही दिल्या.





संत निवृत्तीनाथ महाराजांच्या पौषवारी यात्रोत्सवाच्या तयारी आढावा बैठक वर्षा निवासस्थान येथे पार पडली. या बैठकीला पालकमंत्री दादाजी भुसे, खासदार हेमंत गोडसे, आमदार हिरामण खोसकर, सुहास कांदे, नगरविकास विभागाचे प्रधान सचिव गोविंदराज, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल, नाशिक ग्रामीण पोलीस अधीक्षक प्रवीण देशमाने, नाशिकचे प्रभारी जिल्हाधिकारी बाबासाहेब पारधे, संत निवृत्तीनाथ समाधी संस्थानचे अध्यक्ष निलेश गाढवे यांच्यासह हे दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.


या वेळी मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, संत निवृत्तीनाथ महाराजांच्या पौषवारी यात्रोत्सवासाठी राज्यभरातून लाखो वारकरी येत असतात. संत परंपरेतील विश्वगुरू अशी ओळख असणाऱ्या संत निवृत्तीनाथ महाराजांचा पौषवारी सोहळा हा आषाढी आणि कार्तिकी वारी इतकाच भव्य स्वरुपात साजरा होत असतो. श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर परिसरात होणाऱ्या सोहळ्याच्या आयोजनासाठी निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही. या सोहळ्याचे नियोजन करतांना प्रशासनाने याला नाशिक येथे २०२७मध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याची रंगीत तालीम म्हणून या सोहळ्याकडे पाहावे.

संत निवृत्तीनाथ महाराजांच्या पौषवारी यात्रोत्सव सर्वांच्या समन्वयातून आणि सहकार्यातून नक्कीच यशस्वी होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या वेळी पालकमंत्री भुसे आणि जिल्हाधिकाऱ्यांनी सोहळ्याच्या तयारीविषयी माहिती दिली.

## वाहतूक पोलिसांकडून लहानग्यांना नियमांचे धडे

**उरण : प्रतिनिधी**

न्हावाशेवा वाहतूक शाखेतर्फे रस्ता सुरक्षा अभियान अंतर्गत मोरु नारायण म्हात्रे विद्यालय, खारकोपर, उलवे येथे रस्ता सुरक्षा व वाहतुकीचे नियम या विषयावर चित्रकला स्पर्धेचे आयोजन शुक्रवारी करण्यात आले होते. या वेळी छोटा पोलीस मास्करेडचा वापर करून वाहतूक नियमांबाबत विद्यार्थ्यांना जनजागृती करण्यात आली आहे.



बेशिस्त वाहनचालक, वाढते अपघात यावर नियंत्रण ठेवण्यासाठी नवी मुंबई वाहतूक शाखेचे उपायुक्त तिरुपती काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली व न्हावा शेवा पोलीस वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जी. एम. मुजावर, पोलीस शिपाई मयूर पाटील व मोरू नारायण म्हात्रे विद्यालयाचे प्राचार्य, शिक्षक यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. चित्रकला स्पर्धेत सहभाग घेतलेल्या विद्यार्थ्यांना वाहतूक शाखा व विद्यालयाकडून सन्मानित करण्यात आले.

## माथेरान नागरी पतसंस्थेचा अभ्यास दौरा

**कर्जत : प्रतिनिधी**

माथेरान नागरी पतसंस्थेच्या संचालक मंडळाने आपल्या संस्थेतील भागधारक आणि सभासद यांना अधिक योजना देण्यासाठी सोलापूर जिल्ह्यातील तीन पतसंस्था आणि क्रेडिट सोसायट्या यांच्या भेटी घेऊन त्या संस्थांच्या कामकाजाची माहिती घेतली. या अभ्यास दौऱ्यामध्ये सभापती अजय सावंत, संचालक विजय कदम, कुलदीप जाधव, रामचंद्र ढेबे, गजानन आबनावें, निसार शारवान, विजय सावंत, नितीन शेळके, चंद्रकांत काळे, तज्ज्ञ संचालक गिरीश पवार, अनिल गायकवाड यांच्यासह पतसंस्थेत पिग्मी संकलनात सहभाग घेणारे एजंट देवानंद कदम, संतोष शिंदे आणि संस्थेचे सचिव योगेश जाधव हे सहभागी झाले आहेत.

## निधनाची अफवा पसरवणे महागात!

### पूनम पांडेविरोधात पोलिसांत तक्रार दाखल

**मुंबई : प्रतिनिधी**

स्वत:च्या निधनाची अफवा पसरवणारी अभिनेत्री आणि मॉडेल पूनम पांडे हिच्याविरोधात वकील अली काशिफ खान देशमुखने पोलिसांत तक्रार दाखल केली आहे. शिवाय पूनमची मॅनेजर निकिता शर्मा आणि एजन्सीविरोधात आयपीसी कलम ४१७, ४२०, १२० बी, ३४ अंतर्गत एफआयआर दाखल करण्याची मागणी केली आहे.

पूनम पांडेने २ फेब्रुवारी रोजी तिच्या निधनाची अफवा पसरवून खळबळ माजवली होती. गर्भाशय मुखाच्या कॅन्सरने तिचे निधन झाल्याची बातमी तिच्या अधिकृत इन्स्टाग्राम अकाउंटवरुन शेअर करण्यात आली होती. निधनाची बातमी समोर आल्यानंतर पूनमच्या मॅनेजरचे, तिच्या कुटुंबियांचे फोन बंद होते. अभिनेत्रीच्या मृतदेहाचा कोणताही पत्ता लागत नसल्याने या निधनाबाबत मोठा सस्पेन्स क्रिएट झाला होता, पण २४ तासांनंतर पूनमने स्वत: लाईव्ह येत ती जिवंत असल्याचे सांगितले. गर्भाशय मुखाच्या कॅन्सरबाबत जनजागृती करण्यासाठी निधनाची खोटी बातमी पसरवल्याचे तिने सांगितले, पण तिच्या या स्पष्टीकरणानंतर अनेकांनी तिच्यावर टीका केली आहे. अनेक सेलिब्रिटींसह, नेटकऱ्यांनी मृत्यूची अफवा पसरविणे अतिशय संतापजनक आणि लाजिरवाणे असल्याचे म्हटले आहे.

दरम्यान, ऑल इंडिया सिनेवर्कर्स असोसिएशननेही पूनम पांडेविरोधात एफआयआर दाखल करण्याची मागणी केली आहे. पूनमने पसरवलेली निधनाची खोटी बातमी, निधनाचा केलेला स्टंट अत्यंत चुकीचा आहे. गर्भाशय मुखाच्या कर्करोगाबाबत जनजागृती करण्याच्या नावाखाली तिने केलेली स्वत:ची जाहिरात अमान्य असल्याचे असोसिएशनच्या अधिकाऱ्यांनी म्हटले आहे. त्यामुळे पूनम आता गोत्यात येण्याची चिन्हे आहेत.

## खारघरमध्ये अश्वमेध महायज्ञानिमित्त विशेष पूजा



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

अखिल विश्व गायत्री परिवाराच्या वतीने खारघर सेंट्रल पार्क मैदानामध्ये अश्वमेध महायज्ञाचे आयोजन करण्यात आले आहे. २१ ते २५ फेब्रुवारी या कालावधीत हा महायज्ञ होणार आहे. या महायज्ञासाठी रविवारी (दि. ४) महायज्ञाच्या हवन कुंडाच्या प्रकटीकरणाची विशेष पूजा करण्यात आली.

या वेळी शांतिकुंज हरिद्वारच्या महान विद्वानांनी सनातन वैदिक पद्धतीनुसार विधी केले. पाच जोडप्यांचे पूजन करून व वैदिक पद्धतीने महायज्ञासाठी प्रारंभिक कुंड उघडून अश्वमेध महायज्ञासाठी यज्ञशाळेच्या उभारणीचे काम चालू केले. या पूजेच्या वेळी मुंबई अश्वमेध महायज्ञाचे समन्वयक मनुभाई पटेल, शरद पारधी, परमंद द्विवेदी आदींची प्रमुख उपस्थिती होती.

शरद पारधी म्हणाले की, या महायज्ञात १००८ कुंड असणार असून प्रत्येक कुंडात १० जण मिळून हवन करणार आहेत. अशा प्रकारे एका वेळी १० हजारांहून अधिक लोक यज्ञात हवन करणार आहेत. ११०० उपाचार्यांना हवन कुंडाची देखभाल आणि योग्य व्यवस्था करण्यासाठी उच्च स्तरावर प्रशिक्षण दिले जात आहे.

२२ फेब्रुवारी रोजी सकाळी ७ वाजता देवपूजन चालू होईल आणि दुपारी २ वाजेपर्यंत चालेल. या महायज्ञात सर्व जाती-पंथांसाठी प्रवेश पूर्णपणे विनामूल्य असेल. प्रत्येक व्यक्ती आपल्या भक्तीनुसार या हवनात सहभागी होऊ शकते. महायज्ञादरम्यान चार हजारांहून अधिक जोडपी एकत्र पूजेत सहभागी होणार आहेत.

महायज्ञात माता भगवतीदेवी भोजनालय या नावाने चार भोजनालय असणार आहेत. प्रत्येक भोजनालयात प्रतिदिन ८० हजारांहून अधिक भाविकांना महाप्रसाद उपलब्ध होणार आहे.

संभाजीनगर, श्रीरामपुरम, मीराबाईनगर, एकनाथनगर, संत ज्ञानेश्वरनगर इत्यादी नावाने एकूण आठ शहरे स्थापन केली जाणार आहेत. येथे विविध प्रांतातून आलेल्या भाविकांची राहण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे.

## रत्नाकर घरत यांना राज्यस्तरीय पुरस्कार

**मुंबई : प्रतिनिधी**

लोक गौरव राष्ट्रीय एकात्मता परिषद आणि टीएमजी क्रिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या कार्यक्रमात रत्नाकर घरत यांना राज्यस्तरीय टीएमजी अनमोल कर्यागौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. मुंबई येथील मराठी पत्रकार भवन येथे हा सन्मान सोहळा पार पडला.

राज्यातील तेहतीस जिल्ह्यातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या सत्कार मूर्तींना या वेळी सन्मानित करण्यात आले. रत्नाकर घरत हे गेली २० वर्षे सामाजिक क्षेत्रात विशेषतः आदिवासी समाजामध्ये शासनाच्या विविध योजना राबवून त्यांना रोजगार आणि मूलभूत सोयी सुविधा मिळाव्यात यासाठी अहोरात्र कार्य करीत आहेत. आदिवासी समाजामध्ये आरोग्य, शिक्षण, रोजगार, हक्कांची जाणीव जागृती तसेच आदर्श वस्ती योजना यशस्वीपणे राबवून या समाजाला मुख्य प्रवाहात आणण्याचा कसोशीने प्रयत्न करीत आहेत. याचीच नोंद घेऊन रत्नाकर घरत यांना अभिनय क्षेत्रातील प्रसिद्ध मराठी अभिनेते जयवंत वाडकर यांच्या हस्ते सन्मानचिन्ह आणि सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

या वेळी उरण सामाजिक संस्थेचे प्रा. राजेंद्र मढवी यांनादेखील सन्मानित करण्यात आले. सोहळ्यासाठी अभिनेते जयवंत वाडकर, संस्थेचे सर्वेसर्वा नासीर खान, अध्यक्षा सलमा एन. खान, प्रमुख समन्वयक डॉ. शैलेंद्र पवार, अभिनेते झाकीर खान, देवेंद्र भुजबळ, निवृत्त पोलीस अधिकारी सुनीता नाशिककर डॉ. राजेंद्र येवले आदी उपस्थित होते.



## विसपुते कॉलेज व एलाईट आय केअरमध्ये सामंजस्य करार

**पनवेल : प्रतिनिधी**

डोळे हे ज्ञानार्जनाचे महत्त्वाचे माध्यम असते. त्यांची निगा राखणे हे प्रत्येक विद्यार्थ्यास व शिक्षकास आवश्यक आहे याच गरजेचे महत्त्व समजून श्री बापूसाहेब डी. डी. विसपुते कॉलेज ऑफ एज्युकेशन नवीन पनवेल व एलाईट आय केअर यांच्यादरम्यान शनिवारी (दि.३) नेत्र आरोग्य जनजागृतीविषयक सामंजस्य करार करण्यात आला.

आदर्श समुहाचे चेअरमन धनराजजी विसपुते आणि संचालिका संगिता विसपुते यांच्या मार्गदर्शनाखाली आणि महाविद्यालयाच्या प्राचार्य ॲड. डॉ. सीमा कांबळे यांच्या पुढाकाराने नेत्र आरोग्य जनजागृतीविषयक सामंजस्य करार करण्यात आला.



ह्या करारा अंतर्गत एलाईट आय केअरतर्फे महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची नेत्र तपासणी तसेच मार्गदर्शन, महाविद्यालयाच्या पुढाकाराने ग्रामीण भागामध्ये मोफत नेत्रतपासणी शिबिर, विविध चर्चासत्रे व समुपदेशन सत्रे राबविण्यात येणार आहे.

कराराद्वारे विद्यार्थ्यांमधील नेत्र विषयक समस्यांचे निराकरण व त्यावर त्वरीत उपाय करणे शक्य होणार आहे, असे एलाईट आय केअरचे संचालक व प्रसिद्ध नेत्र तपासणी तज्ज्ञ अजय जैन यांनी स्पष्ट केले.

करारावेळी एलाईट आय केअरचे सदस्य तसेच महाविद्यालयाचे प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## वडखळ पोलीस निरीक्षक तानाजी नारनवर यांना सेवानिरोप

**पेण : प्रतिनिधी**

वडखळ पोलीस ठाण्याचे कर्तव्यदक्ष पोलीस निरिक्षक तानाजी नारनवर यांची अलिबाग कार्यक्षेत्रात बदली झाल्याने आयोजित निरोप समारंभाप्रसंगी पोलीस अधिकारी, अंमलदार, कर्मचारी तसेच उपस्थितीत ग्रामस्थ गहिवरले होते. तानाजी नारनवर यांच्याविषयी आपले मनोगत सांगताना अनेकांचे डोळे पाणावले.

त्यानंतर नवनिर्वाचित पोलीस निरीक्षक प्रसाद पांढरे यांचे उपस्थित वडखळकरांनी स्वागत केले.

या वेळी उपविभागीय पोलीस अधिकारी शिवाजी फडतरे, पोलीस निरीक्षक देवेंद्र पोळ, रंजीत जाधव, अभिजित जाधव, सहाय्यक उपनिरीक्षक सुभाष सोनावळे, उपनिरिक्षक विजय टेमघरे, अंमलदार अमोल पाटील, निलेश ठेणे, नेहा पाटील, वडखळ माजी सरपंच योगेश पाटील, डोलवी सरपंच परशुराम म्हात्रे, सदस्य निलेश म्हात्रे आदी उपस्थित होते.



पान १ वरुन

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते शिवाजीनगर येथील जलकुंभाचे लोकार्पण

या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर म्हणाले, मला मनापासून आनंद होत आहे की, माझ्या हातून अजून एक चांगलं काम गावासाठी झालंय. पाणी ही आपली मूलभूत गरज असली तरी त्याचा वापर जपून केला पाहिजे.

## पद्मदुर्गावर अवतरली शिवशाही

सकाळी शिवप्रेमी महेंद्र मोहिते यांच्या हस्ते सपत्नीक गड पूजन करण्यात आले व शिव आरती करण्यात आली. सोबतच किल्ल्यात कोटेश्वरी देवीचे मूळ स्थान आहे तिथे पूजन करण्यात आले. कार्यक्रमास महाडचे शिवप्रेमी सुरेश पवार, रोहित पवार, शेखर, पद्मदुर्ग जागर संवर्धन समितीचे अध्यक्ष अशील ठाकूर, साकेत वडके, आदेश दांडेकर, राहुल कासार, रूपेश जामकर, गणेश सतविडकर, संकेत आरकशी, मंगेश रणदिवे, सतेज विरुकुड, विरेंद्र गायकर, विजय वाणी, अच्युत चव्हाण, प्रदीप बागडे, संदीप घरत, सुनील शेळके, रूपेश दांडेकर यांच्यासह शिवप्रेमी उपस्थित होते.

पूजन झाल्यावर शिवरायांची प्रतिमा सजवलेल्या पालखीत विराजमान करून वाजत गाजत पालखी गडाच्या बुरूजांवरून फिरवण्यात आली. नंतर कोटेश्वरीचे मूळ स्थान असलेल्या देवीच्या देवळात दर्शनाला नेण्यात आली. या वेळी शिवप्रेमींनी शिवगर्जना करीत ढोल ताशाच्या गजरात देवीचा उदो उदो केला. नंतर युवकांनी व महिला, लहान मुले यांनी शौर्याचे खेळ तलवारबाजी, भालेफेक करीत लक्ष वेधले.

नुकतेच खासदार सुनील तटकरे व आमदार महेंद्र दळवी यांनी पद्मदुर्ग किल्ल्याचा पाहणी दौरा केला आणि गडाला कायमस्वरूपी जेटी, गडाची दुरुस्ती व पर्यटकांना ये-जा करण्यासाठी अधिकृत बोटसेवेचे नियोजन करण्याचे ठरविले आहे. हे काम लवकरात लवकर सुरू व्हावे तसेच पुरातत्व खात्याकडून या किल्ल्याचे संवर्धन केले जावे, अशी अपेक्षा पद्मदुर्ग जागर समितीचे अध्यक्ष आशिल ठाकूर यांनी प्रस्तुत प्रतिनिधीशी बोलताना केली.

## सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयाचे स्नेहसंमेलन उत्साहात; मान्यवरांची उपस्थिती

मराठी मीडियम स्कूल कमिटीचे चेअरमन शरद खारकर, संस्थेचे रायगड विभागीय अधिकारी रोहिदास ठाकूर, मोरू नारायण म्हात्रे व तुकाराम नारायण घरत महाविद्यालय आणि रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलचे चेअरमन भार्गव ठाकूर, अर्चना परेश ठाकूर, माजी पं.स.सदस्य रत्नप्रभा घरत, माजी नगरसेविका दर्शना भोईर, राजू खारकर आदी उपस्थित होते. या वेळी विद्यार्थ्यांनी आपल्या नृत्याने उपस्थितांची मने जिंकली

## पनवेलमधील आरोपीचा उत्तर प्रदेश पोलिसांकडून शोध

**पनवेल : वार्ताहर**

पत्नीच्या कुटूंबीयांकडून हुंडा घेतल्याप्रकरणी पसार झालेला व त्यानंतर पनवेल येथे वास्तव्यास असलेल्या आरोपीच्या घराला उत्तर प्रदेश पोलिसांनी न्यायालयाच्या आदेशाने नोटिसा लावण्यात आल्या आहेत, तसेच रेल्वे स्टेशन व शासकीय इमारतीवरसुद्धा नोटीसा लावण्यात आल्या आहेत.

आरोपी देवीप्रसाद पाडा हा पनवेल शहरातील जेएनपीटी मार्गावरील जोडिका मॅरेथॉन मेन्स जॉन येथे वास्तव्यास असून या ठिकाणी उत्तर प्रदेश येथील पोलीस गेले असता तेथे तो नसल्याने सीआरपीसीच्या नोटीसा चिटकवण्यात आल्या आहेत. तशाच प्रकारे एक नोटीस पनवेल रेल्वेस्टेशन व एक नोटीस तहसीलदार कार्यालय परिसर येथे लावण्यात आल्या आहे. नोटिसीमध्ये एक महिन्याचा आत न्यायालयात आरोपी उपस्थित राहिला नाही तर त्याची संपत्ती जप्त करण्याची कारवाई होईल, २०२३मधील घटनेत गोपीगंज कोतवाली जनपद भदोही उत्तर प्रदेश येथे तक्रार दाखल करण्यात आली होती.



### दुखवटा

## प्रभाकर पारंगे



**नागोठणे** : नागोठणेजवळील वेलशेत गावचे सुपुत्र, सुप्रसिद्ध शाहीर प्रभाकर डुंगाजी पारंगे यांचे रविवारी (दि.४) सकाळी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांचे ६१ वर्ष वय होते. कोकणच्या संस्कृतीचा मानाच्या शक्ती तुरा (बाल्या डान्स) नृत्य प्रकारातील एक पहाडी आवाजाचे सुप्रसिद्ध गायक म्हणून स्व. प्रभाकर पारंगे यांची ओळख होती. कै. प्रभाकर पारंगे यांच्या पश्चात पत्नी, दोन विवाहित मुले, एक विवाहित कन्या, सुना, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

## जगन्नाथ देशमुख



**खोपोली** : शहरातील ज्येष्ठ व्यापारी जगन्नाथ देशमुख यांचे वयाच्या ८२ वर्षी वृद्धत्वाने निधन झाले. माजी नगरसेवक व भाजप नेते सूर्यकांत देशमुख यांचे ते ज्येष्ठ बंधू होते. त्यांच्या अंत्यविधीला खोपोलीचे माजी नगराध्यक्ष दत्ताजी मसुरकर, कर्जतचे उपनगराध्यक्ष ओसवाल, भाजप पदाधिकारी दीपक बेहरे, समीर गोगटे, रमेश रेटरेकर, केटीएसपी मंडळाचे पदाधिकारी किशोर पाटील, माजी नगरसेवक श्रीकांत पुरी, काशिनाथ पाटील, अरुण पुरी, रामदास रासम यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. त्यांच्या पश्चात दोन मुले, मुली, सुना व नातवंडे असा मोठा परिवार आहे.

# भाजप पनवेल शहर युवा मोर्चाच्या नूतन पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र प्रदान



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजप पनवेल शहराच्या युवा मोर्चाची कार्यकारणीची निवड नुकतीच जाहीर करण्यात आली होती. या नवीन पदाधिकाऱ्यांना शनिवारी (दि. ३) पनवेल शहरातील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात नियुक्तीपत्र देण्यात आले. आमदार प्रशांत ठाकूर आणि उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी यांच्या प्रमुख उपस्थितीत या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यामध्ये पनवेल शहराच्या सरचिटणीसपदी अक्षय सिंग, उपाध्यक्षपदी संदीप पाटील, उपाध्यक्षपदी प्रवीण मोरबाळे, उपाध्यक्षपदी प्रतीक बहिरा, सरचिटणीस चेतन डुकरे, वरून डांगर, प्रशांत शेटे, कोषाध्यक्षपदी मयूर कदम, कार्यकारणी सदस्य म्हणून अनिकेत भोईर, कोमल कोळी, साहिल मोरे, चिन्मय मोरे सुजित म्हात्रे, अभिजित चव्हाण, सर्वज्ञ ठाकूर, अक्षय भगत, अंकिता फडके यांची तर युवती प्रमुख संयोजक पदी हर्षदा सोळंकी, सोशल मीडिया संयोजकपदी अनिमेश पटवर्धन, युवा वॉरिअर संयोजकपदी सुमित गायकवाड, आत्मनिर्भर भारत अभियान संयोजकपदी सिद्धेश खानावकर, नमो राजपुत ॲप संयोजक अश्विन सातपुते यांची तर प्रभाग १४च्या अध्यक्षपदी शुभम कांबळे, १५ चे अध्यक्षपदी रोहित कोळी, १६ अध्यक्षपदी मयुरेश आंग्रे, १७चे अध्यक्षपदी श्रावण घोसाळकर, १८चे



अध्यक्षपदी आकाश बैद, १९चे अध्यक्षपदी संतोष कुंवर २०चे अध्यक्षपदी स्वरूप मुंबईकर यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले.

या कार्यक्रमाला माधव बानगुडे उत्तर रायगड जिल्हा युवा मोर्चाचे अध्यक्ष मयुरेश नेतकर, माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, पनवेल शहराचे अध्यक्ष अनिल भगत, जिल्ह्याच्या उपाध्यक्ष चारुशीला घरत, माजी नगरसेवक मनोज भुजबळ, अजय बहिर, तेजस कांडपिळे, माजी नगरसेविका राजश्री वावेकर, सुशीला घरत आदी उपस्थित होते. या वेळी उपस्थित मान्यवरांनी पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले.

## लक्ष्मी आय इन्स्टिट्यूटच्या नवीन दालनाचे उद्घाटन





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गेली ४४ वर्षे फक्त पनवेल नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्र तसेच देशभरात आणि परदेशात डॉ. सुहास हळदीपूरकर यांचा नेत्र सेवा देण्यासाठी दबदबा आहे. रविवारी (दि. ४) पनवेल शहरातील उरण नाका येथे लक्ष्मी आय हॉस्पिटल आणि इन्स्टिटयूटच्या नवीन दालनाचे उद्घाटन झाले.

लक्ष्मी आय हॉस्पिटल आणि इन्स्टिटयूटच्या नवीन दालनाला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट दिली आणि डॉ.सुहास हळदीपूरकर



अभिनंदन केले. या दालनामध्ये अत्याधुनिक अशी नेत्रसेवेतील तंत्रज्ञाचा वापर करण्यात येणार आहे. त्यामध्ये प्रामुख्याने मोतीबिंदू शस्त्रस्क्रियेसाठी लागणारे रोबेटीक लेझर हे येथे उपलब्ध होणार आहे. तसेच डोळ्याच्या वेगवेगळ्या शस्त्रक्रिया, नंबर घालवणे, मोतीबिंदू, फेको तंत्रज्ञाचा विकास आदी गोष्टी येथे उपलब्ध केल्या आहेत. या वेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते दोन वेगवेगळ्या दालनांचे उद्घाटन करण्यात आले.

या कार्यक्रमाला पनवेल महापालिकेच्या माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, माजी नगरसेवक राजू सोनी, डॉ. सुहास हळदीपूरकर यांच्या पत्नी जयवंती हळदीपुरकर, तन्वी हळदीपूरकर, डॉ. देवेंद्र वेंकटरमणी यांची उपस्थिती होती.

## मिठाईच्या दुकानात चोरी

### १,८२,००० रुपयांचा मुद्देमाल लंपास

**पनवेल :** तालुक्यातील आपटा फाटा येथे असलेल्या श्री बिकानेर मिठाई वाल्याच्या दुकानात अज्ञात चोरट्यांनी चोरी करून जवळपास १,८२,००० रुपये किमतीचा मुद्देमाल लंपास केला आहे.

ललित राईका यांचे आपटा फाटा येथे श्री बिकानेर मिठाई नावाचे दुकान असून ठिकाणी कोणीतरी अज्ञात चोरट्यांनी सकाळच्या वेळेस दुकानाच्या छताचा पत्रा उचकटून तो बाजूला करून त्या वाटे आत प्रवेश करून दुकानात असलेली रोख रक्कम ८४,००० रुपये तसेच काजू, बदाम, मनुका, पिस्ता, खारीक, चॉकलेट व इतर ऐवज अशा मिळून जवळपास १,८२,००० रुपये किमतीचा मुद्देमाल लंपास केला आहे. याबाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## भरधाव कारची ट्रेलरला धडक

### कारचालकाचा मृत्यू

**पनवेल :** पुणे-कडून मुंबईकडे जाणाऱ्या लेनवर जुन्या महामार्गावरून जाणाऱ्या भरधाव चारचाकी गाडीने त्याच्या पुढे चाललेल्या ट्रेलरला पाठीमागून धडक दिल्याने झालेल्या अपघातात गाडीचा चालक गंभीररित्या जखमी होऊन मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.

किया कंपनीची कार (जेएच ०१-एफए ४९०८) घेऊन चालक राहुल लाठी (वय ३२, रा. अजमेर) हा पनवेलजवळील पुणेकडून मुंबईकडे जाणाऱ्या लेनवर जुन्या महामार्गावरून भरधाव वेगाने जात होता. कोळखे गावाच्या हद्दीत त्याने त्याच्या पुढे चाललेल्या ट्रेलरला (एमएच ०६ एक्यू १३३७) पाठीमागून धडक दिली. या अपघातात कारचालक राहुल लाठी हा गंभीररित्या जखमी होऊन त्याचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.





**उलवे : येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयाच्या उपशिक्षिका, रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्य ज्योत्स्ना ठाकूर यांची लाईफ मेंबरपदी निवड झाल्याबद्दल उलवे शाखेचे चेअरमन शरद खारकर, रायगड विभागीय अधिकारी आर.पी. ठाकूर, सहाय्यक अधिकारी शहाजी फडतरे, नावडे शाखेच्या मुख्याध्यापिका विशाखा मोहिते, वाशी शाखेच्या उपशिक्षिका मीनाक्षी मोरे, जासई शाखेच्या उपशिक्षिका संगीता बाबर यांनी शुभेच्छा दिल्या.**

## उरण महाविद्यालयात करिअर मार्गदर्शन

**उरण : रामप्रहर वृत्त**

कोकण ज्ञानपीठ उरण कला आणि वाणिज्य महाविद्यालय, उरण आणि भारती विद्यापीठाचे व्यवस्थापन आणि संशोधन महाविद्यालय, नवी मुंबई यांच्यातील सामंजस्य कराराअंतर्गत उच्च शिक्षणातील संधी याविषयावर करिअर मार्गदर्शन उपक्रम शनिवारी (दि. ३) आयोजित करण्यात आला.

ह्या उपक्रमास मार्गदर्शक म्हणून डॉ. कुलदीप भालेराव, प्रमुख-पीएच.डी.विभाग, भारती विद्यापीठ, व्यवस्थापन आणि संशोधन महाविद्यालय, नवी मुंबई यांनी विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाचे महत्त्व आणि त्यातील संधी या विषयावर मार्गदर्शन केले आणि विद्यार्थ्यांच्या विविध शंकाचे निरसन केले. डॉ. अविनाश धवन, प्रा. रियाझ पठाण, प्रा. हनत शेख, आणि डॉ. ए. आर. चव्हाण, समन्वयक, आय क्यू ए सी उपस्थित राहून विद्यार्थ्यांचा उत्साह वाढविला.

या उपक्रमाचे मुख्य आयोजक महाविद्यालय प्राचार्य किशोर शमा यांनी मुख्य वक्ते डॉ. कुलदीप भालेराव, नवी मुंबई बीव्हीआयएमएसआरच्या संचालक डॉ. अंजली कळसे आयोजक आणि उपस्थित प्राध्यापक आणि उपस्थित विद्यार्थ्यांचे आभार मानले.



## भिंगारवाडी येथे नारी शक्ती वंदन कार्यक्रम



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भिंगार ग्रामपंचायतीचे उपसरपंच अशोक गायकर यांच्या संकल्पनेतून नारी शक्ती वंदन कार्यक्रम भिंगारवाडी येथे घेण्यात आला.

ग्रामपंचायत निवडणुकीमध्ये भिंगार ग्रामपंचायतीमध्ये भाजपचा झेंडा फडकला. याच निवडणुकीदरम्यान देण्यात आलेल्या वचनाची पूर्तता करण्यात आली. गावात मुलगी जन्माला आली की तिच्या नावाने पाच फूल किंवा फळ झाडे लावण्यात येतील, असे आश्वासन अशोक गायकर यांनी दिले होते. त्याची सुरुवात करण्यात आली. तीन मुलींचा जन्म झाला होता त्यांच्या आई वडिलांच्या उपस्थितीमध्ये त्या मुलीच्या पायाला स्पर्श करून प्रत्येकी पाच झाडांची लागवड करण्यात आली.

कार्यक्रमासाठी उपसरपंच अशोक राजाराम गायकर, पळस्पे जिल्हा परिषद युवा मोर्चा अध्यक्ष योगेश लहाने, कोन पंचायत समिती युवा मोर्चा अध्यक्ष संदेश पाटील, ग्रामपंचायत सदस्या शामल महेश लहाने, सदस्य रवी गायकर, संजीवन गायकर, आकाश राणे, अविनाश शिसवे, प्रमोद ठाकूर, वैभव राणे, आशा सेविका वैशाली ठाकूर, महिला मंडळ व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**कामोठे : येथील सेक्टर १४मध्ये श्री जेनरिक मेडिसिन स्टोअरच्या रायगड जिल्ह्यातील २४व्या शाखेचे उद्घाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते रविवारी झाले. या वेळी पनवेल महापालिकेचे माजी नगरसेवक विजय चिपळेकर, भाजप शहराध्यक्ष रवींद्र जोशी, माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, शहर उपाध्यक्ष शरद जगताप, किशोर गोवारी, हर्षवर्धन पाटील, श्री जेनरिक मेडिसिन स्टोर झोन हेड नीलम कदम, सुनील जांभेकर, सुधाकर पाटील, राहुल फत्ता, महेश गोवारी आदी उपस्थित होते.**





**पनवेल : लेवा समाज मित्र मंडळ, पनवेल-उरण परिसर पनवेलच्या वतीने आयोजित वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमाला आमदार प्रशांत ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. या वेळी मंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील, खजिनदार चंद्रकांत पाटील, सचिव सुधाकर भोगे यांनी त्यांचे स्वागत केले.**



**खारघर : अयोध्येत झालेल्या श्रीराम मंदिर प्राणप्रतिष्ठेच्या कार्यक्रमात विठ्ठल कांबळे व उज्वला कांबळे यांना यजमान म्हणून मान मिळाला होता. रामलल्लाचा प्रसाद सर्वांना मिळावा या हेतूने त्यांनी रविवारी श्री सत्यनारायण पूजेचे आयोजन केले होते. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट दिली. त्यांचे कांबळे दाम्पत्याने स्वागत केले. या वेळी भाजप खारघर शहर अध्यक्ष प्रवीण पाटील आणि कांबळे कुटुंबीय उपस्थित होते.**



**पनवेल : गव्हाण ग्रामपंचायतीच्या हद्दीतील शिवाजीनगर गावासाठी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अर्थसहाय्यातून जलकुंभ उभारण्यात आले आहे. या जलकुंभाचे रविवारी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. या ठिकाणी माजी पंचायत समिती सदस्य रत्नप्रभा घरत यांनी भेट दिली. शिवाजीनगर ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष कृष्णाशेठ ठाकूर यांनी त्यांचे स्वागत केले. या वेळी नंदा ठाकूर, आशा म्हात्रे, रजनी ठाकूर, वर्षा म्हात्रे, अनुसया ठाकूर, सुचिता ठाकूर, शुभांगी ठाकूर, वैशाली ठाकूर, जी.के. ठाकूर, किशोर ठाकूर, शिवाजी ठाकूर, एकनाथ ठाकूर, चिंतामण ठाकूर, जितेंद्र कडू व ग्रामस्थ उपस्थित होते.**




**पनवेल : शिवसह्याद्री सहकारी पतपेढीच्या उलवे येथील शाखेचे उद्घाटन झाले. या वेळी भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी तेथे भेट दिली. आयोजकांनी त्यांचे स्वागत केले.**

## संपादकीय

# विरोधी आघाड्यांचे तीनतेरा

देशात भाजप व सहकाऱ्यांची राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए) लोकसभा निवडणुकीसाठी जोमाने सज्ज होत आहेत. या सत्ताधारी आघाडीत एकजूटही पहावयास मिळते. दुसरीकडे मात्र विरोधी पक्षांच्या विविध आघाड्यांमध्ये कमालीचा विसंवाद दिसत असून त्यांच्यातील वाद चव्हाट्यावर येऊ लागले आहेत. आता तर या आघाड्यांतील घटक पक्षांचे नेते बेताल विधाने करीत असून त्यामुळे समस्त देशवासीयांचे मनोरंजन होत आहे.

**भाजपच्या एनडीएविरोधात काँग्रेस व इतर काही पक्षांनी इंडिया आघाडी तयार केली. खरंतर ही युपीए अर्थात संयुक्त पुरोगामी आघाडीची नवी आवृती, पण या आघाडीत आता अनेक पक्षांची रसमिसळ झाल्याने तसेच लोक भाव देत नसल्याने नवे नाव देऊन मतदारांचा आकर्षित करण्याचा प्रयत्न केला जातोय, जो केविलवाणा म्हटला पाहिजे, कारण अशी आघाड्यांची नावे बदलून मते मिळत नसतात. त्यासाठी विचारांची बैठक, देशाप्रति आत्मियता, जनतेविषयी तळमळ असणे आवश्यक आहे. याची या मंडळींमध्ये वानवा जाणवते. म्हणूनच गेल्या नऊ वर्षांपूर्वी देशात परिवर्तन घडले असून देश विकास आणि प्रगतीच्या मार्गावर आला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्वप्रथम २०१४मध्ये केंद्रातील काँग्रेसप्रणित भ्रष्टाचारी, घोटाळेबाज राजवट उलथवून लावली. त्यानंतर नवभारताची उभारणी सुरू झाली. विविध लोकोपयोगी योजना, जनकल्याणकारी उपक्रम, धडाकेबाज निर्णय घेऊन मोदी सरकारने देशालाच नव्हे; तर समस्त जगाला आपल्या कामगिरीची दखल घ्यायला लावली. बहुमताचे सरकार आणि भक्कम आघाडीच्या पाठबळावर मोदी सरकारने २०१९पासून दुसऱ्या टर्मला दमदार सुरुवात केली असून देशाला वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले आहे. त्यामुळे आगामी लोकसभा निवडणुकीतही 'फिर एक बार मोदी सरकार' सत्तेवर येणार असल्याचे संकेत मिळत आहेत. त्यामुळे धास्तावलेल्या विरोधकांनी शिळ्या कढीला ऊत देऊन इंडिया आघाडीची स्थापना केली. सुरुवातीला त्यांनी या आघाडीचा मोठा गाजावाजा केल्या आणि राणा भीमदेवी थाटात घोषणा केल्या, मात्र त्यांचा हा बार फुसका ठरला आहे. या आघाडीतील घटक पक्ष आम आदमी पक्षाने स्वबळावर लढण्याचा नारा दिला. पाठोपाठ पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी तृणमूल काँग्रेसही स्वतंत्रपणे निवडणुकांना सामोरे जाणार असल्याचे जाहीर केले. हे दोन धक्के कमी म्हणून की काय बिहारचे मुख्यमंत्री व जेडीयूचे नेते यांनी इंडिया आघाडीची साथ सोडत एनडीएची कास धरली. या हादऱ्यांमुळे इंडिया आघाडीचे नेते बिथरले असून ते बेताल वक्तव्य करू लागले आहे. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे यांनी पक्षाच्या रॅलीत बोलताना कुत्र्याप्रमाणे भुंकणाऱ्या कार्यकर्त्यांकडे बूथचे काम सोपवा, असे अजब विधान केले. काँग्रेसचे युवराज राहुलबाबाही अधूनमधून काहीही बरळत असतात. इकडे महाराष्ट्रात महाविकास आघाडीतील प्रवेशावरून नाराज असलेले वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर या आघाडीची यथेच्छ अब्रू घालवत आहे. दररोज वेगवेगळ्या पद्धतीने भाष्य करीत ते आपल्याच सहकारी पक्षांना त्यांच्या मर्यादांची जाणीव करून देत आहेत. भाजपप्रणित एनडीए आघाडी निश्चित ध्येयानुसार वाटचाल करीत असताना दुसरीकडे विरोधी आघाड्यांची पावले अडखळत आहेत. ते एकवेळ समजू शकतो, मात्र प्रतिस्पर्धी एवढा तगडा असताना वाचाळ नेते अशी वादग्रस्त विधाने कशी काय करू शकतात हा प्रश्न उपस्थित होतो.**

# बैल, घोंगड्या, टोपल्यांसाठी प्रसिद्ध म्हसा यात्रा






**खबरबात**
**विजय मांडे**

महाराष्ट्रात अनेक यात्रा भरत असतात. कोकणातील आंगणेवाडीची भराडी देवीची यात्रा जशी प्रसिध्द आहे. तशीच ठाणे जिल्ह्यातील म्हासोबाची म्हणजेच म्हसाची यात्रा प्रसिध्द आहे. कोकणातील भराडी देवीची यात्रा दोन दिवसांची असते तर म्हसाची यात्रा तब्बल पंधरा दिवस असते. या यात्रेत विविध प्रकारच्या वस्तूंबरोबरच जनावरे, घोंगड्या, टोपल्या यांचा विशेष बाजार भरतो.

पौष पौर्णिमा आली की मुरबाड तालुक्यातील म्हसा यात्रेचे वेध लागतात. म्हसा हे ठाणे जिल्ह्याच्या मुरबाड तालुक्यातील प्राचीन गाव आहे. कर्जतपासून ४२ कि.मी. तर मुरबाडपासून १० किलोमीटर अंतरावर असलेल्या या गावात म्हसोबाचे (भगवान शंकराचे) प्राचीन मंदिर आहे, या मंदिरावरून गावास म्हसा हे नाव पडले. म्हसा आणि खांबलिंगेश्वर इटुकल्या मंदिरांचे गाव, मग गर्दीने फुलून जाते. पंचक्रोशीतील भाविक म्हसोबा आणि खामलिंगेश्वराच्या दर्शनाला येतात. या यात्रेला दोनशे वर्षांची परंपरा आहे तीन ते चार किलोमीटर परिसरामध्ये ही यात्रा भरते. दरवर्षी यात्रेकरूंच्या गर्दीचा उंच्चाक असणाऱ्या या यात्रेसाठी मुरबाड तालुक्यासह शहापूर, कल्याण, ठाणे, रायगड, पालघर नाशिक, नगर, पुणे, सोलापूर, तसेच कर्नाटकमधून भाविक खास करून म्हसा यात्रेला येत असतात. कर्जत - मुरबाड रस्त्यापासून ही यात्रा सुरू होत असल्याने वाहतुकीत बदल करण्यात येतो. तसेच आरोग्य यंत्रणा सुध्दा सज्ज असते.



पुरातन काळापासून सुरू असलेल्या म्हसा यात्रेच्या नियोजनासाठी प्रशासकीय स्तरावर बैठका नुकत्याच झाल्या. छोटेछोटे व्यावसायिक म्हसा गावात उतरू लागले आहेत. यासाठी देवस्थान ट्रस्टींमार्फत नियोजन सुरू झाले आहे. या बाजारात टोपल्यांची मोठी उलाढाल होते. लहान मोठ्या आकारांच्या टोपल्या, करंडे येथे मिळतात. तसेच उखळ शेतीसाठी लागणारी अवजारे आणि घरगुती वापराच्या वस्तू या बाजारात मिळतात. मेंढीच्या लोकरीपासून बनवलेल्या अस्सल घोंगड्या आणि कांबळे हे या यात्रेचे आणखी एक वैशिष्ट्य आहे. विणलेल्या आणि लाटीव अशा दोन प्रकारच्या घोंगड्या येथे मिळतात. पाचशे रुपयांपासून ते पंचवीसशे रुपयेपर्यंत घोंगड्या येथे मिळत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

घाटमाथ्या वरून खिल्लारी बैल जोड्या विक्रीला येतात. एका बैलाची किंमत एक ते दीड दोन लाखा पासून सुरू होते. बैलजोडी तीन - चार लाख रुपयांनी खरेदी केली जाते. पौर्णिमेला म्हसा यात्रा भरण्याची प्रथा आहे त्या अगोदर खरेदी केलेले बैल रात्री बारा वाजता म्हसा फुटला म्हणून पावती बनवली जाते. बैल जोडीवर थाप मारून बैल जनावरे म्हसा यात्रेमधून बाहेर पडतात अशी प्रथा आहे. पूर्वी घोडे-गाढवेसुध्दा या यात्रेत विक्रीसाठी येत असत. तसेच या जनावरांना पिण्यासाठी पाणी आणण्याची गरज नसे. यात्रेच्या एक दोन दिवस आधी शेतामध्ये पाणी येत असे. विशेष म्हणजे रात्रीच्या मनोरंजनासाठी तमाशाचे फड सुध्दा या यात्रेत असत मात्र जस जसे दिवस बदलत जात आहेत. तस तसे त्यात बदल होत चालला आहे. मोठ मोठे पाळणे, नवनवीन चक्री पाळणे या यात्रेत आले आहेत.

पूर्वी या यात्रेसाठी बैलगाडीने भाविक येत असत व तंबू उभारून शेतात मुक्काम करीत असत. मुरबाड, कल्याण, ठाणे, भिवंडी, शहापूर,पनवेल, बदलापूर, विठ्ठलवाडी, वाडा, कर्जत आदी भागातून अनेक एसटी बसेस नेहमी धावत असल्यामुळे तेच म्हसा यात्रा स्पेशल एस टी गाड्याही ठिकठिकाणाहून सुटत असल्याने एसटी विभागाला कोटी रुपयाचा नफा मिळत असतो. मात्र या यात्रेसाठी येणाऱ्या लाखो भाविकांना पार्किंग, शौचालय, स्वच्छ पाणी या सुविधेपासून यापासून दरवर्षीप्रमाणे यंदाही मुकावे लागले आहे. त्यामुळे मुरबाडकरांमध्ये तसेच यात्रेकरूंमध्ये नाराजी पसरली जाते.

महाराष्ट्रातील ठाणे जिल्ह्यातील मुरबाड तालुक्याची म्हसा गावाची जत्रा, परंतु तेथील म्हसोबा शिवशंकराची नाळ भीमाशंकर मंदिराशी जोडलेली आहे. निसर्गमय घनदाट जंगल अभयारण्यामधील शंकराचे स्थान असलेले म्हसोबा मंदिर पुरातन आहे. मुरबाडमधील जागृत देवस्थान असलेल्या म्हसोबाची यात्रेची तयारी महिनाभरापासून भक्तिमय वातावरणात सुरू असते. पंधरा दिवस चालणाऱ्या या यात्रेचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजेच यात्रेत भरणारा बैलांचा बाजार. अनेक जनावरे या यात्रेत विक्रीसाठी आणली जातात. बैलाची जात रंग आणि वयानुसार त्यांच्या किमती ठरतात गुलाल उधळून बैलांचा व्यवहार होतो. पंधरा दिवसांत या बैलांची उलाढाल एक कोटी रुपयांतहून जास्त होते. या यात्रेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे इथला टोपली बाजार. बांबूच्या टोपली बनवणारे ठाकूर समाजाचे बांधव व भगिनी मोठ्या संख्येने या यात्रेला टोपल्यांची विक्री करण्यासाठी येत असतात.

## बदलते तंत्रज्ञान

### बाय-बाय नोकिया! कंपनीने घेतला मोठा निर्णय



काही वर्षांपूर्वी मोबाईल मार्केटमध्ये NOKIAचे राज्य होते, पण कालांतराने स्मार्टफोन्सच्या शर्यतीत अनेक कंपन्या उतरल्याने नोकिया मागे पडली. अलीकडच्या काही वर्षात नोकियाने स्मार्टफोन्स मार्केटमध्ये पुनरागमन केले, पण हवा तसा प्रतिसाद मिळाला नाही. आता नोकियाचे डिव्हाईस बनवणाऱ्या HMD Global कंपनीने एक मोठी घोषणा केली आहे.

एचएमडी ग्लोबल आता त्यांच्या मूळ ब्रँड, म्हणजेच HMD Global नावाने स्मार्टफोन लॉन्च करणार आहे. कंपनी गेल्या काही काळापासून कंपनीकडून याचे संकेत दिले जात होते. आता HMDने नोकिया ब्रँड त्यांच्या सोशल मीडिया अकाउंट एक्सवरून काढून टाकला आहे. कंपनी लवकरच आपला नवीन स्मार्टफोन लॉन्च करेल, जो एचएमडी ब्रँडिंगसह येईल. हा स्मार्टफोन लवकरच सुरू होणाऱ्या मोबाइल वर्ल्ड काँग्रेस (MWC २०२४)मध्ये लॉन्च केला जाऊ शकतो.

**नोकिया बंद होणार?**

नोकिया पुन्हा एकदा बंद पडणार का, असा प्रश्न अनेकांच्या मनात येत आहे. यापूर्वी मायक्रोसॉफ्टनेही नोकियाचे फोन्स विकले होते, मात्र नंतर कंपनीने नोकिया ब्रँडचे हक्क एचएमडी ग्लोबलला विकले. आता परत नोकिया स्मार्टफोन बंद होणार, असे नाही. कंपनीने स्पष्ट केले आहे की, ते नोकियाचे फोनदेखील बनवत राहतील. पण, कंपनी नवीन ब्रँडच्या नावाने व्यवसाय करेल. कंपनीची नवीन वेबसाइट hmd.com वर तुम्हाला नोकिया फोन्स मिळतील.

**कंपनीचे नियोजन काय आहे?**

कंपनीने सांगितले की, ते मूळ कंपनी एचएमडी ब्रँडिंग वाढवण्यावर भर देत आहे. लवकरच कंपनीचा नवीन स्मार्टफोन येणार आहे, पण एचएमडी ग्लोबलच्या या स्मार्टफोनबद्दल फारशी माहिती समोर आलेली नाही. कंपनीने जारी केलेल्या टीझरनुसार, हा हँडसेट ड्युअल रियर कॅमेरा सेटअपसह येऊ शकतो. याचे डिझाइन मायक्रोसॉफ्ट लुमियाप्रमाणे असू शकते.

# कीर्तनकार स्व. बाबामहाराज सातारकर



**निमित्त**

महाराष्ट्रातील प्रसिद्ध वारकरी कीर्तनकार, प्रवचनकार म्हणून हभप बाबामहाराज सातारकर यांची ओळख राहिलेली आहे. त्यांचे पूर्ण नाव नीळकंठ ज्ञानेश्वर गोरे. त्यांचा जन्म सातारा येथे ५ फेब्रुवारी १९३६ रोजी झाला. त्यांच्या कुळात १३५ वर्षांपासून वारकरी संप्रदायाची परंपरा चालत आली. त्यांची आज जयंती...

बाबामहाराजांचे वडील ज्ञानेश्वर दादामहाराज गोरे हे उत्कृष्ट मृदूंगवादक होते. त्यांच्या मातोश्री लक्ष्मीबाई ज्ञानेश्वर गोरे यांना संत वाङ्मयाची आवड होती. बाबामहाराज यांचे चुलते आप्पामहाराज आणि अण्णामहाराज यांच्याकडून त्यांनी परमार्थाचे धडे घेतले. बाबामहाराजांनी इंग्रजी माध्यमातून एसएससीपर्यंतचे शिक्षण घेतले. आठव्या वर्षांपासून ते श्री सद्‌गुरू दादामहाराज यांच्या कीर्तनात अभंगांच्या चाली म्हणत असत. वयाच्या ११व्या वर्षांपासून त्यांनी पुरोहितबुवा, आग्रा घराण्याचे लताफत हुसेन खाँसाहेब यांच्याकडे शास्त्रीय गायनाचे धडे घेतले.

वयाच्या १२व्या वर्षांपासून बाबामहाराजांनी मुंबई आकाशवाणी केंद्रावर गाण्यास सुरुवात केली. वडिलांकडून त्यांनी पखवाज वादनाचे शिक्षण घेतले. २६ मार्च १९५४ रोजी बाबामहाराजांचा विवाह वारकरी संप्रदायातील देशमुख महाराज यांचे विणेकरी पांडुरंग जाधव यांची नात दुर्गाबाई नामदेव जाधव यांच्याशी झाला. १९५० ते १९५४ या काळात बाबामहाराजांनी लाकूड सामानाचा (फर्निचर) व्यवसाय केला. पुढे परमार्थाला वाहून घेण्याचा निश्चय करीत त्यांनी हा व्यवसाय बंद केला. सुमारे १५० वर्षे परमार्थात मग्न असलेल्या सातारकर घराण्यातील बाबामहाराज यांच्याकडे ८० वर्षांपासून श्री ज्ञानेश्वरमहाराज पालखी सोहळ्यात मानकरी ही परंपरा आहे. तुकाराममहाराज पालखी सोहळ्याबरोबर ही मानकरी म्हणून परंपरा सातारकर घराण्याने सुमारे १०० वर्षे राखली. १९६२ साली आप्पामहाराज यांच्या देहावसानानंतर त्यांची परंपरा बाबामहाराजांनी पुढे चालू ठेवली. महाराष्ट्र, कर्नाटक, गुजरात, आंध्रप्रदेश अशा राज्यात कीर्तन-प्रवचनांचे शेकडो कार्यक्रम त्यांनी केले. १९७४ साली श्री सद्‌गुरू दादामहाराज यांच्या जन्मशताब्दी निमित्त मुंबई, आळंदी, पंढरपूर येथे कीर्तन महोत्सवांचे आयोजन त्यांनी केले. १९८० ते १९९९ या कालावधीत ज्ञानेश्वरीची प्रवचने त्यांनी केली. १९९८ ते २००१ या कालावधीत अमृतानुभवावर प्रवचने केली. डिसेंबर १९८३पासून दरवर्षी संतांच्या गावी कीर्तन सप्ताह आयोजित करण्याची परंपरा त्यांनी सुरू केली. भंडारा डोंगर, देहू, त्र्यंबकेश्वर, नेवासे, पैठण, पंढरपूर, पिंपळनेर आदी ठिकाणी त्यांनी कीर्तन सप्ताहांचे आयोजन केले. बाबामहाराजांनी सुमारे १५ लाख व्यक्तींना संप्रदायाची दिक्षा देऊन त्यांना व्यसनमुक्त केले. १९८३ साली त्यांनी जनसेवेसाठी श्री चैतन्य अध्यात्मिक ज्ञान प्रसार संस्थेची स्थापना केली. या संस्थेमार्फत ६० ते ७० हजार भाविकांना विनामूल्य वैद्यकीय सेवा तसेच औषधे पुरविण्यात येतात. १९८६ साली लंडन येथे हिंदीतून चार प्रवचने तसेच अमेरिकेत बोस्टन, फिलाडेल्फिया, कॅलिफोर्निया, न्यूयॉर्क, आरलँडो आदी ठिकाणी १४ ज्ञानेश्वरी प्रवचने बाबामहाराजांनी केली.

कीर्तनाच्या सुमारे ५७ ध्वनिफिती तसेच १२ सीडी बाबामहाराजांनी प्रकाशित केल्या आहेत. लोणावळ्यापासून आठ किमी अंतरांवर दुधिवरे येथे १६ एकर जागेत बाबामहाराजांनी आध्यत्मिक केंद्र उभे केले. विविध पुरस्कारांनीही बाबामहाराजांना सन्मानित करण्यात आले आहे. वारकरी संप्रदायाचे तत्त्वज्ञान आणि समाजसेवा यांचा सुंदर समन्वय त्यांनी आपल्या जीवन कर्तृत्वाने साध्य केला. २६ ऑक्टोबर २०२३ रोजी त्यांचे निधन झाले.

**(साभार : मराठी विश्वकोष)**

**क्लिक...क्लिक...!**



**अलिबाग : वीकेण्डला येथील समुद्रकिनारे पर्यटकांनी बहरलेले असतात. नागाव बीचवर सुर्यास्तवेळी पाण्यात मनमुराद आनंद लुटताना पर्यटकांचे टिपलेले छायाचित्र.**

## आरोग्य प्रहर

### मखाणा खाण्याचे अप्रतिम फायदे खूप; जाणून घ्या

मखाणा हे पोषक तत्वांचे भांडार मानले जाते. कारण यामध्ये प्रथिने, फायबर, कॅल्शियम, मॅग्नेशियम आणि लोह मोठ्या प्रमाणात असते. रोज मखाणा खाण्याचे आरोग्यदायी फायदे तुम्हाला माहित नसतील तर आज जाणून घेऊया. आरोग्य फायदे आहेत.



मखाणा तुम्ही तर रोज सकाळी रिकाम्या पोटी खाल्ल्यास रक्तदाबासारख्या अनेक समस्या दूर होऊ शकतात. हाडे मजबूत करण्यासाठी मखाणा फायदेशीर मानला जातो. याशिवाय रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्याचे कामदेखील मखाणा करते.

**वजन कमी करण्यासाठी मदत**

तुम्हाला जर तुमचे वजन कमी करायचे असेल तर तुम्ही तुमच्या आहारात मखाणाचा समावेश करु शकता. तुम्हाला वजनावर नियंत्रण ठेवायचे असेल तर रोज सकाळी रिकाम्या पोटी मखणा खावे. यामध्ये फॅट आणि कॅलरीज कमी असतात. या शिवाय फायबर भरपूर असते. त्यामुळे पोट जास्त काळ भरलेले राहण्यास मदत होते. यामुळे भूक लागत नाही.

**हाडे मजबूत बनवते**

मखाणामध्ये भरपूर प्रमाणात कॅल्शियम असते. जे हाडे मजबूत करण्याचे काम करते. सकाळी रिकाम्या पोटी मखना खाल्ल्याने हाडांच्या संबधित समस्या दूर होऊ शकतात.

**मखाणा वाढवते रोगप्रतिकारशक्ती**

सकाळी जर तुम्ही रिकाम्या पोटी मखाणा खाल्ला तर तुमची रोगप्रतिकारशक्ती वाढू शकते. मखाणामध्ये भरपूर प्रमाणात अँटीऑक्सिडंट असतात. ज्या रोगप्रतिकारशक्ती वाढवतात. शरीराला अनेक प्रकारच्या आजारांपासून वाचवण्याचे काम मखाणा करते.

**रक्तातील साखरेवर नियंत्रण**

सकाळी जर तुम्ही रिकाम्या पोटी मखाणा खालला तर रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित ठेवण्यास मदत होते. मधुमेहाच्या रुग्णांसाठी मखाणा खूप फायदेशीर मानला जातो. मधुमेहींनी डॉक्टरांच्या सल्ल्यानेच मखाणा खावा.

**पचनक्रिया सुधारते**

सकाळी रिकाम्या पोटी जर तुम्ही मखाणा खालला तर तुमची पचनक्रिया देखील चांगली राहते. मखाणामध्ये मुबलक प्रमाणात फायबर आढळते, जे पचनक्रिया मजबूत करण्याचे काम करते. सकाळी रिकाम्या पोटी याचे सेवन केल्याने बद्धकोष्ठता, अपचन आणि ॲसिडिटीसारख्या समस्या सहज दूर होतात.

# दिव्यांग सक्षमीकरणासाठी राजिपचा पुढाकार

## फिरत्या वाहनावरील दुकान योजना; १० फेब्रुवारीपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**रायगड : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हा परिषदेमार्फत दिव्यांग व्यक्तींच्या सक्षमीकरणासाठी फिरत्या वाहनावरील दुकान ही योजना हाती घेण्यात आली आहे. दिव्यांगांना रोजगार प्राप्त होऊन ते स्वावलंबी व्हावेत या उद्देशाने त्यांना पर्यावरणस्नेही फिरत्या वाहनावरील दुकान (ई-टेम्पो, मोबाईल शॉप ऑन व्हेईकल) उपलब्ध करून देण्यात येणार आहे.



ही योजना जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागाच्या माध्यमातून राबविण्यात येणार असून, यासाठी जिल्हा परिषदेच्या सेस फंडातून दोन कोटी ५० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्यांनी १० फेब्रुवारीपर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांनी केले. रायगड जिल्हा परिषद ही दिव्यांग व्यक्तींच्या कल्याणासाठी सातत्याने विविध योजना, उपक्रम राबवित असते.

याचाच एक भाग म्हणून दिव्यांग व्यक्तींसाठी फिरत्या वाहनावरील दुकान ही योजना हाती घेण्यात आली आहे. या योजनेचा लाभ सुमारे ६५ दिव्यांग व्यक्तींना दिला जाणार आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी तालुक्यातील पंचायत समिती गटविकास अधिकारी यांचे कार्यालयात संपर्क साधून आपले परिपूर्ण अर्ज, सर्व आवश्यक कागदपत्रांसह सादर करावेत. त्यामध्ये प्रामुख्याने, केंद्र शासनाच्या नवीन कायद्यानुसार दिव्यांगत्वाचे ४० टक्क्यांपेक्षा जास्त दिव्यांगत्व प्रमाणपत्र आवश्यक आहे, तसेच लाभार्थी किंवा सोबती यांचा वाहन चालविण्याचा परवाना, आधार कार्ड, वीज देयक, रेशन कार्ड, मतदार कार्ड, वार्षिक उत्पन्नाचा दाखला, बौद्धिक अक्षम (मतीमंद) अर्जदाराच्या बाबतीत कायदेशीर पालक म्हणून जिल्हाधिकारी यांचे स्वाक्षरीचे प्रमाणपत्र, वाहनाची योग्य ती काळजी घेण्याबाबत लाभार्थ्यांचे लिखित बंधपत्र जोडून अर्ज सादर करणे आवश्यक आहे. अर्ज पंचायत समिती कार्यालयामार्फत जिल्हा परिषदेच्या दिव्यांग कल्याण विभाग, समाजकल्याण विभागाकडे सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्यांनी अर्ज सादर करण्याचे आवाहन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांनी परिषदेत केले आहे. पर्यावरणस्नेही फिरत्या वाहनावरील दुकान (ई-टेम्पो, मोबाईल शॉप ऑन व्हेईकल) सुमारे तीन लाख ५० हजार रुपये किंमतीचे आहे. ई-टेम्पो लाभार्थ्यांना १०० टक्के अनुदानावर देण्यात येणार आहे.

दव्यांग व्यक्तींच्या फिरत्या वाहनावरील दुकान धर्तीवर महिला बचत गटांसाठीसुद्धा सदर योजना राबविण्याचा निर्णय घेण्यात आला असून, यासाठी दोन कोटी निधीची तरतूद करण्यात आली आहे. या निधीतून जिल्ह्यातील सुमारे ५७ बचत गटांना व्यवसाय करण्यासाठी फिरत्या वाहनावरील दुकान उपलब्ध करून देण्यात येणार आहे. बचत गटांसाठी या योजनेची अंमलबजावणी जिल्हा परिषदेच्या महिला व बालविकास विभागाच्या माध्यमातून करण्यात येणार आहे.

# कर्जतहून शिर्डीला निघाली पायी पालखी

### शंभरहून अधिक साईभक्त सहभागी

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत शहरातील श्री गुरू साई सेवा मंडळाच्या वतीने कर्जत ते शिर्डी पदयात्रा पालखी सोहळ्याचे आयोजन केले असून शनिवारी (दि. ३) सकाळी ही पालखी कर्जतमधून शिर्डीकडे निघाली. ही पालखी शिर्डीला नवव्या दिवशी पोहचणार आहे. या पदयात्रेत शंभरहून अधिक साईभक्त सहभागी झाले आहेत.



शहरातील श्री दत्त मंदिरापासून पदयात्रा पालखी सोहळ्याचा शुभारंभ करण्यात आला. ढोल पथकाच्या तालावर कर्जत शहरातून मिरवणूक काढण्यात आली. त्यांनतर कडाव, कशेळेमार्गे पदयात्रेचे शिर्डीकडे प्रस्थान झाले. पदयात्रेची सुरुवात राजन भोळे, संतोष दाभाणे, सुनील देशमुख, प्रसाद पाटील, दिलीप आंबवणे, चेतन देशमुख आदींच्या हस्ते पालखी पूजन करून करण्यात आली.

या प्रसंगी सुचिता वांजळे, प्रतिभा देशमुख, लीना पाटील, दत्तात्रेय म्हसे आदी उपस्थित होते. त्यांनतर चौकाचौकात ढोल पथकाने विविध प्रात्यक्षिके करून रंगत आणली.

जिजामाता उद्यानासमोर नगराध्यक्ष सुवर्णा जोशी, माजी नगराध्यक्ष राजेश लाड आदींनी पालखीचे स्वागत केले. पोसरी येथे माजी उपसभापती मनोहर थोरवे, नगरसेवक संकेत भासे आदींनी पालखीचे दर्शन घेऊन स्वागत केले.

कुंडलज गावातील साई भक्तांनी पालखीची आरती केली. त्यानंतर पालखी शिर्डीकडे रवाना झाली.

ही पदयात्रा पहिल्या दिवशी हनुमान मंदिर वारे, दुसऱ्या दिवशी मुरबाड तालुक्यातील जायगाव, तिसऱ्या दिवशी सावर्णेगाव, चौथ्या दिवशी दत्तमंदिर दत्तवाडी पिंपळगाव जोगा, पाचव्या दिवशी संत सावता महाराज मंदिर आळेफाटा, सहाव्या दिवशी काळभैरव मंदिर, डोळासणे, सातव्या दिवशी जिल्हा परिषद शाळा, निळवंडे, आठव्या दिवशी गोपाळकृष्ण मंदिर, नांदुर्खी येथे मुक्काम आणि नवव्या दिवशी शिर्डी येथे श्री साईबाबांचे दर्शन घेऊन दुपारी पदयात्रेचा समारोप होणार आहे.

# 'संघटना ही कर्तबगार सदस्यांवर अवलंबून'

**मुरुड : प्रतिनिधी**

संघटना ही कोणतीही असो तिचे कार्य हे त्यातील कर्तबगार सदस्यांवर अवलंबून असते. सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक संघाच्या संघटनेचे कार्य निश्चितच वाखाणण्याजोगे आहे, असे प्रतिपादन पं. स. गटशिक्षणाधिकारी सुनील गवळी यांनी नांदगावमध्ये केले.

सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक संघटनेचा प्रथम वर्धापन दिन पार पडला. त्या वेळी ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा संघटनेचे अध्यक्ष तुकाराम खांडेकर होते. सरपंच सेजल घुमकर उपस्थित होत्या. त्यांनी निवृत्त शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. संघटनेचे तालुकाध्यक्ष लक्ष्मण दांडेकर यांनी, संघटना ही सेवानिवृत्त शिक्षकांना भेडसावणाऱ्या समस्या सोडवण्यासाठी तसेच आपापसातील जिव्हाळा वृद्धिंगत होण्यासाठी असल्याचे स्पष्ट केले. या वेळी ७५ वर्षांवरील शिक्षक तथा गुणवंत शिक्षकांचा सत्कार करण्यात आला.



# नेणवली शाळेत कुष्ठरोग जनजागृती व समुपदेशन

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील नेणवली शाळेत मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अंतर्गत नुकतेच टीएचओ ऑफिस सुधागडमार्फत आरोग्यविषयक मार्गदर्शन व किशोरवयीन मुलींचे समुदेशन करण्यात आले.



या वेळी वैद्यकीय अधिकारी डॉ. दीपाली देशमुख, डॉ. मोरे, कुष्ठरोग समन्वयक रणदिवे उपस्थित होते. कुष्ठरोग स्पर्श जनजागृती अभियान अंतर्गत श्री. रणदिवे यांनी मुलांना कुष्ठरोग जिवाणूविषयीची माहिती पोस्टरसह दाखवून सांगितली व सर्व विद्यार्थ्यांची शारीरिक चाचणी घेऊन कुष्ठरोग स्पर्श तपासणी केली. त्यानंतर डॉ. दीपाली देशमुख यांनी सर्व मुलांना आरोग्यविषयक शारीरिक स्वच्छता, मानसिक, भावनिक सुरक्षितता, सामाजिक सुरक्षितता तसेच कोणते अन्नपदार्थ खावे, काय खाऊ नये तसेच अनोळखी स्पर्श याबाबत मार्गदर्शन केले. तद्नंतर किशोरवयीन मुलींना स्वतंत्र समुपदेशन करून वयात येताना होणारे शारीरिक बदल, मासिक पाळी, त्यातील आरोग्य व स्वच्छता, सॅनिटरी नॅपकिन, नमुना घ्यावयाची काळजी याबाबत समुपदेशन केले. कार्यक्रमसाठी मुख्याध्यापक राजेंद्र अंबिके व उपशिक्षक गणपत वरगडे यांनी आभार मानले.

> **विद्यार्थ्यांना मिळालेली आरोग्य विषयक, कुष्ठरोग स्पर्श विषयक व किशोरवयीन समुदेशन नक्कीच महत्त्वपूर्ण आहे.**
>
> **-राजेंद्र अंबिके, मुख्याध्यापक, नेणवली**



**अलिबाग : शहर पोलीस ठाण्याचे नवनिर्वाचित पोलीस उपनिरीक्षक संजय पाटील यांना सराफ संघटनेकडून अध्यक्ष रणजीत जैन, सचिव राकेश सोनी, सहसचिव उमेश मोरे, खजिनदार सोहन कडेसा, सहखजिनदार शशिकांत सोनी, राकेश जैन, मदन सोनी व रवी सोनी यांनी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.**

राम प्रहर
वाचनीय बातम्या आणि जाहिरातींसाठी वाचा

# रायगडात पळस वेधताहेत लक्ष

## रंगोत्सव पाहण्याची पर्यटकांनाही भुरळ

**पाली : प्रतिनिधी**

सह्याद्रीच्या डोंगर रांगा, विपूल वनसंपदा लाभलेल्या पाली सुधागडसह रायगड जिल्ह्यात विविध प्रकारची फळे, फुले झाडे आहेत. जिल्ह्यातील डोंगर रांगा, रस्त्याच्या कडेला, माळरान व जंगल आदी ठिकाणी फुलांनी बहरलेली पळसाची झाडे दिसत आहेत. जणूकाही तांबड्या व केशरी फुलांचा रंगोत्सव येथे सुरू झाला आहे असे वाटते. यामुळे सामान्य नागरिकांसह निसर्ग अभ्यासकदेखील सुखावले आहेत. पर्यटकदेखील हा रंगोत्सव पाहण्यासाठी आवर्जून येथे थांबतात आणि डोळे भरून या फुलांचा आनंद घेतात.



फुलांनी बहरलेले ही झाडे अनेक पशु-पक्ष्यांना खाद्य व आश्रय देतात. त्यामुळे येथे विविध पक्षांचा किलबिलाट असतो. जैवविविधतादेखील बहरते. निसर्ग अभ्यासकांना ही पर्वणी आहे. हा नजारा पाहण्यासाठी पर्यटक देखील याठिकाणी निरीक्षणासाठी आवर्जून येत असतात. पळसाला फ्लेम ऑफ द फॉरेस्ट असे म्हणतात, कारण पानगळीनंतर आलेल्या लाल केशरी रंगाच्या फुलांना ज्वालासारखा आकार असतो. संपूर्ण झाड पेटल्यासारखे दिसते. ब्रिटिशांनी हे नाव दिले असल्याचे बोलले जाते. फ्लेम ऑफ द फॉरेस्ट, पॅरट ट्री, पलाश, पळस अशा अनेक नावांनी ओळखला जाणारा पळस वृक्ष सध्या रानावनात सगळ्यांचे लक्ष वेधून घेत आहे. तांबड्या भगव्या रंगाच्या फुलांनी बहरलेला पळस वृक्ष सह्याद्रीच्या परिसराला लाभलेला जणू एक दागिनाच आहे.

### अनेक उपयोग

*पळस ही एक आयुर्वेदिक औषधी वनस्पती आहे. याची पाने तळहाताएवढी रुंद व जाड असतात. जेवण्याच्या पत्रावळीसाठी या पानाचा वापर होतो. उत्तर भारतात या झाडास वसंत ऋतूत (होळीच्या सुमारास) गर्द केशरी रंगाची फुले येतात, तर महाराष्ट्रात हिवाळ्यात (डिसेंबर-जानेवारी) फुले येतात. या फुलांचा उपयोग पूर्वी रंग करण्यास होत असे. याच्या बिया फार कडू असतात. त्यास पळसपापडी म्हणतात. त्याचा औषधी उपयोग आहे.*

## निवडक

### नेणवली शाळेत बँक आपल्या भेटीला



**पाली** : मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अंतर्गत राजिप शाळा नेणवली येथे बँक आपल्या भेटीला हा उपक्रम नुकताच झाला. या अंतर्गत एचडीएफसी बँक शाखा पाली सुधागडचे बँक व्यवस्थापक संजय नाईक व त्यांचे सर्व सहकाऱ्यांनी नेणवली शाळेत येऊन विद्यार्थ्यांना बँकेच्या व्यवहारांची माहिती दिली. मान्यवरांचे स्वागत व आभार मुख्याध्यापक राजेंद्र अंबिके यांनी मानले. सोबत विषय शिक्षक रवींद्र हंबीर व उपशिक्षक गणपत वरगडे होते. शेवटी बँक कर्मचारी यांनी बँकेविषयी माहितीपत्रक सर्व विद्यार्थ्यांना वाटून पालकांना माहिती देण्यास सांगितले.

### अंजुमन इस्लाम महाविद्यालयात शिबिर



**मुरूड** : येथील अंजुमन इस्लाम जंजिरा विज्ञान पदवी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग, जीवशास्त्र विभाग आणि शासकीय ग्रामीण रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (दि.३) प्रभारी प्राचार्य डॉ. साजिद शेख यांच्या मार्गदर्शनाखाली मुलींसाठी आरोग्य तपासणी शिबिर पार पडले. शिबिरासाठी शासकीय ग्रामीण रुग्णालय येथून डॉ. नेहा शेळके व त्यांच्या टीमचे सहाकार्य लाभले. शिबिरामध्ये जवळपास १०० विद्यार्थिनींची रक्ततपासणी करण्यात आली. शिबिरासाठी राष्ट्रीय सेवा योजना प्रमुख प्रा. नितीन पवार, जीवशात्र विभाग प्रमुख प्रा. जाविद खान तसेच विद्यार्थ्यांमध्ये अमरीन छापेकर, रोजमीन कासकर, फातिमा सुर्वे, आयेशा देशमुख, मोहम्मद कादिरी यांनी परिश्रम घेतले.

### माणगाव पोलीस ठाण्याला ड्रोन कॅमेरा



**माणगाव** : माणगाव पोलीस ठाणे कोकण व मुंबईदरम्यानचे मध्यवर्ती पोलीस ठाणे आहे. पर्यटकांची संख्या, ताम्हिणी घाटात अपघात, मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग वाहतूक कोंडी या सर्व बाबी लक्षात घेऊन अल्ताफ दाउद गंगरेकर यांनी माणगाव पोलीस ठाण्यास ड्रोन कॅमेरा भेट दिला आहे. याबाबत पोलिसांनी त्यांचे आभार मानले.

### संभाजी ढोपे ठरले स्काऊट मास्टर



**पाली** : रायगड जिल्हा भारत स्काऊट-गाईड विभागातर्फे सुधागड तालुक्यातील संत नामदेव माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय नांदगावचे प्राचार्य संभाजी ढोपे यांना आदर्श स्काऊट मास्टर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. पेण येथे झालेल्या कार्यक्रमात रायगड जिल्हा प्राथमिक शिक्षणाधिकारी पुनिता गुरुव यांच्या हस्ते हा पुरस्कार संभाजी ढोपे यांना प्रदान करण्यात आला. या पुरस्काराबद्दल संभाजी ढोपे यांचे जि. प. माजी सदस्य सुरेश खैरे यांच्यासह सर्व पदाधिकारी, मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थ्यांनी अभिनंदन केले आहे.

### विद्यार्थ्यांसाठी लेखन साहित्यवाटप



**पेण** : आदर्श केंद्रप्रमुख रामवाडी येथील रहिवासी हभप कृष्णा महादेव वर्तक यांनी ७३व्या वाढदिवसाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांना लेखन साहित्याचे वाटप केले. ते भाजप अध्यात्मिक सेलचे पेण तालुकाध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी विद्यार्थ्यांशी आत्मचिंतन, अध्यापन पद्धती, विद्यार्थ्यांचे ध्येय, आदर्श पेपर परीक्षा पूर्वतयारी, जीवनमूल्य, टेन्शनमुक्त अभ्यास, परीक्षेत सहज पास होण्यासाठी लागणाऱ्या क्लुप्त्या, परीक्षेत पालकांची जबाबदारी, विद्यार्थ्यांनी घ्यावयाची दक्षता अशा अनेक विषयांवर विद्यार्थ्यांशी चर्चा केली. विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.



**चौक : रसायनी पोलीस ठाण्यात नव्याने रुजू झालेले वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजर बांगर यांचे स्वागत व्यापारी असोसिएशनचे अशोक पटेल व वैभव भोईर यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.**


## जाहिर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीस द्वारे कळविण्यात येत आहे की खालील परिशिष्टात वर्णन केलेली सामाईक मिळकत ही त्यांची विद्यमान मालक **श्री. चांगा महादू गावंड** यांचे कडून कायमस्वरूपी खरेदी करण्याबाबतचा व्यवहार आमचे अशिल **श्री. उदय अनंत तायशेटे व श्री. भूषण उद्य तायशेटे** यांनी ठरविला आहे व या व्यवहाराची जाहीर नोटीस वर्तमानपत्र देण्याबाबत विद्यमान मालक **श्री. चांगा महादू गावंड** यांनी आमच्या अशिलांना लेखि पत्राद्वारे संगितले आहे व आमचे अशिलांच्या सांगण्यावरून ही वर्तमानपत्रात जाहीर नोटिस मी देत आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे पिरकोन ( ५५३३३९)**

**ULPIN: १८३७११५२५८१, तालुका -उरण जिल्हा -रायगड**

| गट क्रमांक | भुधारणा पद्धत | क्षेत्र ( हे.आर.चौ.मी.) | आकार रु.पै. |
| --- | --- | --- | --- |
| २२२/२<br>खाते क्रमांक २३० | २ | ०.२६.००<br>पो.ख ०.०२.०० | ४.०० |
| | | **एकूण क्षेत्र ०.२८.००** | |

वर नमूद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही तिरहित व्यक्तीचा अथवा व्यक्तीच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षीस, खरेदीखत, साठे करार मिळकत, विकसित करणे बाबतचा करार, कुळ, हक्क वारसा, वहीवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्ट्टा, पोटगी, मृत्युपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती किवा त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथम दर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस वर्तमानपत्रात प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदपत्रे पत्रात पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावे अन्यथा दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाही व सदर मिळकत निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदी करण्याचा व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून १४ दिवसांच्या मुदती नंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्या हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधन कारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : ४ फेब्रुवरी २०२४

सही/-
**एड. निलेश झंजाड**

बी १०४ सफायर सी.एच.एस.लि. सेक्टर २२ भूखंड क्रमांक ३३/३४
कामोठे -ता. पनवेल, जि. रायगड बि. सं. क्र. ९९२०४७५८०१

# नेरूळ रेल्वेस्थानकात फेरीवाले वाढले

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

ट्रान्स हार्बर मार्गावरील नेरूळ रेल्वे स्थानकात पश्चिमेकडून प्रवेश करणाऱ्या मार्गावर दोन्ही बाजूला फेरीवाले, फूलविक्रेते आणि इतर व्यावसायिकांनी अतिक्रमण करून बस्तान मांडले आहे. त्यामुळे प्रवाशांना ये-जा करण्यास मोठी कसरत करावी लागत आहे. संबंधित प्रशासनाने कारवाई करण्याची मागणी प्रवाशांकडून करण्यात येत आहे.




नेरूळ रेल्वेस्थानक हे ट्रान्स व हार्बर मार्गावरील महत्त्वाचे स्थानक आहे. पश्चिमेकडील नेरूळ गाव, सारसोळे, कुकशेत गाव परिसरातील प्रवासी या स्थानकातून ये-जा करतात. नेरूळ रेल्वेस्थानकाची निर्मिती सिडकोने केली आहे. स्टेशन कॉम्प्लेक्सचा वाणिज्य वापर व्हावा या हेतूने पूर्व व पश्चिमेला

## प्रवासी त्रस्त

गाळे बांधण्यात आले आहेत.

यातील गाळेधारकांनी समोरील मोकळी जागादेखील गिळंकृत केली आहे. त्यातच नेरूळ स्थानकातील पश्चिमेकडील प्रवेश मार्गात हॉटेल द्वारकाजवळील मार्गावर सकाळ आणि विशेषत: संध्याकाळी उशिरापर्यंत हार, भाजी, फळे आणि इतर खाद्यपदार्थ विक्रेते यांनी बस्तान मांडल्याने त्यातून वाट काढताना प्रवाशांना नाहक त्रास सोसावा लागत आहे.

पश्चिमेकडील कॉम्प्लेक्समध्ये एक वाईन शॉप असून काही जण मद्य घेऊन प्रवाशांच्या मार्गात सर्रास दारू पिताना दिसून येत आहेत. त्याचा विशेषत: महिला वर्गाला त्रास सोसावा लागत आहे. नेरूळ रेल्वे स्थानकातील सुरक्षेची जबाबदारी ही सिडकोची आहे; मात्र या फेरीवाल्यांवर कारवाई होत नसल्याने प्रवाशांकडून संताप व्यक्त केला जात आहे.

# नवी मुंबईतील नायजेरियन नागरिकांना पकडण्यात यश

**पनवेल : वार्ताहर**

गेल्या अनेक वर्षांपासून नवी मुंबई शहरामध्ये बेकायदेशीरपणे वास्तव्य करणाऱ्या नायजेरियन नागरिकांवर नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी पदभार स्वीकारल्यापासून कारवाई सुरू केली होती. संपूर्ण वर्षामध्ये बेकायदेशीर वास्तव्य करणाऱ्या नागरिकांना ताब्यात घेत अनेकांना नोटीसदेखील भारंबे यांनी दिल्या आहेत.

नवी मुंबई पोलिसांनी गेल्या वर्षभरापासून नवी मुंबई शहरात बेकायदेशीरपणे वास्तव्यास असलेल्या ४११ नायजेरियन नागरिकांसह ५०६ परदेशी नागरिकांचा शोध घेतला असल्याचे नवी मुंबईचे पोलिस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी सांगितले. या व्यक्ती एकतर



## अनेकांना नोटीस

योग्य कागदपत्रांशिवाय भारतात आले होते किंवा त्यांच्या व्हिसाची मुदत संपली होती. तसेच या परिसरात अंमली पदार्थांच्या विक्रीवर छापा टाकत असताना पोलिसांना ही माहिती मिळाली. ४११ नायजेरियन पैकी बरेच जण अंमली पदार्थांशी संबंधित गुन्ह्यांमध्ये सामील असल्याचे नवी मुंबईचे पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी सांगितले.

नवी मुंबई पोलिसांनी बेकायदेशीरपणे परदेशी राहणाऱ्या घरमालकांवरही कारवाई सुरू केली आहे. नवी मुंबईत बेकायदेशीरपणे राहणाऱ्या एकूण ४८३ परदेशी नागरिकांना देश सोडण्याच्या नोटीसा देण्यात आल्या असल्याचे भारंबे यांनी सांगितले.

# पनवेल तालुक्यातील ३० शाळा अनधिकृत घोषित

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल तालुक्यातील ३० शाळा रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकार्यानी अनधिकृत घोषित केल्या आहेत. या शाळांमध्ये पालकांनी आपल्या मुलांना प्रवेश घेऊ नये. प्रवेश घेतल्यास भविष्यात त्यांच्या होणार्या शैक्षणिक नुकसानाला शिक्षण विभाग जवाबदार राहणार नसल्याचे पत्र पनवेलचे गट शिक्षण अधिकारी एस.आर. मोहिते यांनी प्रसिध्द केले आहे.

पनवेल तालुक्यात शासनाची मान्यता न घेता काही संस्थांनी प्राथमिक व माध्यमिक शाळा सुरू केल्या आहेत. शाळा सुरू करण्यापूर्वी शासनाची मान्यता घेणे आवश्यक आहे. या शाळांनी शासनाची मान्यता न घेतल्याने या शाळा अनधिकृत घोषित करौन त्या संस्थांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरू करण्यात आली असल्याची माहिती या पत्रात दिली आहे.

# नवी मुंबईतील बेकायदा बांधकामांवर कारवाईचे आदेश

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबईतील ३१ डिसेंबर २०१५ पूर्वीची बेकायदा बांधकामे दंड आकारून नियमित करण्याच्या धोरणासंदर्भातील प्रकरण सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे. असे असले तरी ३१ डिसेंबर २०१५ आधीची आणि नंतर किती बेकायदा बांधकामे बांधली गेली याचे सर्वेक्षण करा, तसेच २०१५ नंतरच्या बेकायदा बांधकामांवर कायद्यानुसार कारवाई करा, असे आदेश उच्च न्यायालयाने नवी मुंबई महापालिकेला दिले आहेत.



बांधकामाची परवानगी न घेताच बांधकामे पूर्ण झालेल्या आणि बांधकामे सुरू असलेल्या बेकायदा बांधकामांवरही कारवाई करण्याचे आदेश मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती आरिफ डॉक्टर यांच्या खंडपीठाने महापालिकेला दिले आहेत. शिवाय ३१ डिसेंबर २०१५ आधीची बेकायदा बांधकामे दंड आकारून नियमित करण्याच्या मागणीसाठी किती अर्ज केले, याचा तपशीलही सादर करण्याचे आदेशही महापालिकेला दिले आहेत.

## वाढदिवसानिमित्त उपक्रम




**नवी मुंबई : माजी महापौर जयवंत सुतार यांच्या नाती दिव्यांका आणि दिव्यता यांचा पहिला वाढदिवस नेरूळ येथील जीवन ज्योती आशालय या अनाथ मुलांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी कार्यरत असणाऱ्या आश्रमातील मुलांसोबत साजरा करण्यात आला. या वेळी आश्रमातील मुलांना एक महिना पुरेल इतका अन्न-धान्यसाठा दिव्यांका आणि दिव्यता यांचे वडील प्रतीक जयवंत सुतार यांच्या वतीने देण्यात आला.**

# सायकल रॅलीद्वारे रस्ता सुरक्षा जनजागृती

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत नवी मुंबई परिवहन कार्यालयमार्फत नागरिकांमध्ये रस्ता सुरक्षा जनजागृती करण्यासाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत. त्याच अनुषंगाने रविवारी (दि. ४) आरटीओ कार्यालयामार्फत नवी मुंबई कार्यक्षेत्रात सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

रॅली वाहन तपासणी केंद्र, नेरूळ येथून प्रारंभ होऊन याच ठिकाणी समाप्त करण्यात आली. रॅलीसाठी हेमांगिनी पाटील (उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, नवी मुंबई), गजानन गावंडे (सहाय्यक परिवहन अधिकारी) यांनी झेंडा दाखवून सायकल रॅलीची सुरुवात केली. या रॅली मध्ये नवी मुंबई शहरातील बहुसंख्य नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभागी होत रॅली यशस्वी केली.



नागरिकांमध्ये रस्ता सुरक्षा जनजागृती प्रभावशाली होण्यासाठी उप प्रादेशिक परिवहन अधिकारी हेमांगीनी पाटील यांनी जनतेशी संवाद साधताना रस्ता सुरक्षिततेचे महत्त्व पटवून दिले. या रॅलीसाठी मोटर वाहन निरीक्षक आशिष दरगोडे, सहायक मोटार वाहन निरीक्षक गणेश लव्हाटे, सूरज घोरपडे, अक्षय जाधव, मयूर जाधव आणि त्यांची टीम, नवी मुंबई मधील विविध सायकल संघटना यांनी मोलाचे सहकार्य केले. सायकल रॅलीद्वारे इधनाची बचत, अपघातांना आळा, सामाजिक व शारिरीक स्वास्थ यांचे महत्त्व पटवून देताना मान्यवरांनी मोलाचे मार्गदर्शन केले.

रस्ता सुरक्षा नागरिकांमध्ये प्रभावशाली राबवत असताना वाढते अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी उप प्रादेशिक परिवहन अधिकारी हेमंगिनी पाटील या वर्षभर विविध उपक्रम जनतेसाठी राबविण्याचा प्रयत्न करीत असतात, त्यामुळे महाराष्ट्र राज्यात नवी मुंबई शहराचे अपघाताचे प्रमाण कमी होण्यात मोठी कामगिरी परिवहन कार्यालय यांनी केली आहे. या पुढेदेखील विद्यार्थी, जनतेसाठी विविध चौक सभा, चित्रकला, आरोग्य शिबिर राबवत नागरिकांना चांगल्या सुविधा पुरविण्याचा प्रयत्न परिवहन कार्यालय नवी मुंबईमार्फत केला जाणार असल्याचे हेमांगिनी पाटील यांनी आश्वासित केले.

या वेळी परिवहन कार्यालय मार्फत सहभागी नागरिकांना प्रशस्तीपत्रक, सन्मान चिन्ह, मेडल्स, रस्ता सुरक्षा संदेश देणारे टी शर्ट वितरण करण्यात आले.

# नरेंद्राचार्य महाराज संस्थानतर्फे सामाजिक उपक्रम

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नरेंद्राचार्य महाराज संस्थान अंतर्गत सामाजिक उपक्रमाच्या अनुषंगाने गुरुवारी (दि. १) मुंबई उपपीठाच्या अंतर्गत गोरेगाव, मुंबई येथे वैद्यकिय उप्रकमांर्गत हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे ट्रॉमा केअर हॉस्पिटल जोगेश्वरी पूर्व येथे बीपीएल ईसीजी मशीनचे वाटप तसेच गरीब व गरजू कुटूंबांना १३ घरघंटीचे वाटप करण्यात आले. मुंबई, वसई, पश्चिम पालघर, पूर्व पालघर, ठाणे शहर, नवी मुंबई, दक्षिण ठाणे, ग्रामीण ठाणे येथून भक्त सेवेसाठी आले होते.



याचबरोबर वैद्यकिय उपक्रमांतर्गत हॉस्पिटला संस्कार धाम विद्यालय, गोरेगाव (पश्चिम) येथे एक वॉटर प्युरिफायर, प्रबोधन विद्या निकेतन मालाड पश्चिम येथे प्रिंटर आणि स्कॅनर, निवारा विद्यालय गोरेगाव पूर्व येथे दोन वॉटर प्युरिफायर्स आणि प्रोजेक्टर विथ स्क्रीन, विद्या विकास मंदिर गोरेगाव पश्चिम येथे दोन वॉटर प्युरिफायर्स, ज्ञानसागर विद्यालय जोगेश्वरी पश्चिम येथे कॉम्प्युटरचे वाटप करण्यात आले.

या वेळी स्थानिक आमदार विद्या ठाकूर, जयप्रकाश ठाकूर, महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष भाजपचे नगरसेवक श्रिकला पिल्ले, समीर देसाई विधानसभा समन्वयक, शिवसेना, महिला व बाल विकास समिती, मुंबई अध्यक्ष शोभा शेलार, जुई ठाकूर (ट्रामा रुग्णालय, सिडिओ), ऋतुजा पाटील (अभियंता, बृहनमुंबई मनपा), हरीश नायडू (उद्योगपती), संजय खंडागळे (टायगर ग्रुप अध्यक्ष मुंबई) तसेच जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज संस्थान उपपीठ मुंबईचे मान्यवर उपस्थित होते. जवळ जवळ १०-१२ हजार भाविकांनी दर्शनाचा लाभ घेतला.

# नवी मुंबईत भजन स्पर्धा रंगली

## दिवाळे कोळीवाड्यात पर्वणी; रसिकश्रोते मंत्रमुग्ध

**नवी मुंबई : बातमीदार**

आज पारंपरिक भजन कीर्तनाचे महत्त्व कमी झाले असले, तरी सर्वसामान्यांची आध्यात्मिक ओढ लक्षात घेता वारकरी संप्रदाय मंडळांना व्यासपीठ मिळवून देण्यासाठी नवी मुंबई येथील दिवाळे कोळीवाड्यातील रेन्बो फ्रेंड सर्कल युवा सामाजिक संस्थेच्या वतीने शनिवार (दि. ३) भव्य संगीत सांप्रदायिक भजन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी, पुंडलिक वरदे हरी विठ्ठल, श्री ज्ञानदेव तुकाराम, पंढरीनाथ महाराज की जयच्या गजरात भजनी मंडळांनी सादर केलेल्या एका पेक्षा एक पारंपरिक भजनानी रसिक श्रोते मंत्रमुग्ध झाले.



या वेळी, ठाणे, रायगड मुंबईसह नवी मुंबईतील श्री बाप्पा देव प्रासादिक भजन मंडळ, ॐ नादब्रम्ह भजन मंडळ, श्री काळेश्वरी प्रासादिक संगीत भजन मंडळ, विष्णुस्मृती भजन सेवा संघ, श्री गांगोरामेश्वर प्रासादिक भजन मंडळ, लिंगेश्वर प्रासादिक भजन मंडळ, मालोबा प्रासादिक महिला भजन मंडळ, ॐ नादब्रम्ह संगीत संगीत महिला मजन मंडळ, श्री पांडुरंग प्रासादिक भजन मंडळ, श्री. सिद्धेश्वर प्रासादिक महिला भजन मंडळ सहभागी झाले होते. या स्पर्धेला भजनरत्न ह.भ.प श्री महादेव बुवा शहाबाजकर, प्रसिद्ध गायिका भारती मढवी व मृदंगार्जुन, तालमनी माऊली सावंत हे परीक्षक म्हणून लाभले होते.

या स्पर्धेतील प्रथम आणि द्वितीय पारितोषिकं विभागून देण्यात आली असून प्रथम क्रमांकाचे मानकरी श्री गांगोरामेश्वर प्रासादिक भजन मंडळ मालाड आणि ॐ नादब्रम्ह संगीत महिला भजन मंडळ ठाणे तर उपविजेते म्हणून द्वितीय पारितोषिक श्री काळेश्वरी प्रासादिक संगीत भजन मंडळ ठाणे व मालोबा प्रासादिक महिला भजन मंडळ भांडुप यांना देण्यात आले. तसेच उत्कृष्ट गायन प्राप्ती पाटील, उत्कृष्ट टाळ - श्री. सिद्धेश्वर प्रासादिक महिला भजन मंडळ, उत्कृष्ट तबला आणि पखवाज वादक (एकत्रित) लिंगेश्वर प्रासादिक भजन मंडळ या पाच सर्वोत्तम वादकांना विशेष पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. कार्यक्रमाप्रसंगी, अन्वी कोळी, कौस्तुभ भाग्यवंत व गंधर्व कोळी यांनी सादर केलेल्या सतार वाद्याने आणि वैष्णवी कोळी हिच्या देहाची तिजोरी गाण्याने प्रेक्षकांची मने जिंकली. या वेळी पंचक्रोशीतील नागरिक उपस्थित होते.

दरम्यान, महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. सांप्रदायिक क्षेत्रात भजनाला विशेष महत्व असून, या अखंडित परंपरेला चालना मिळावी व भजनाला हक्काचे व्यासपीठ मिळावे या हेतुने नियोजन बद्ध भव्य स्वरूपात भजन स्पर्धा आयोजित केली होती. यावर्षीप्रमाणे प्रत्येक वर्षी सांप्रदायिक क्षेत्रातील मान्यवरांचा सन्मान करून, यापुढे देखील अशा वेगवेगळ्या स्पर्धा सुरू ठेवून भजनी मंडळांना एक हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे रेन्बों फ्रेंड सर्कल युवा सामाजिक संस्थेचे अध्यक्ष किरण कोळी यांनी सांगितले.

# खारघरमध्ये ब्रह्मवृंद समाजाचा स्नेहमेळावा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई, पनवेल परिसरात वास्तव्याला असलेल्या ब्राह्मण समाजाचा ब्रह्मवृंद स्नेहमेळावा खारघर येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल येथे झाला. ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते दीपप्रज्वलन झाल्यानंतर पूर्वी सप्रे आणि अपूर्वा मंद्रुपकर यानी गणेशवंदना सादर केली. त्यानंतर सामुहिक रामरक्षा पठण करण्यात आले.

मंदार कुलकर्णी यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. त्यानंतर उपस्थितांचा परिचय करून देण्यात आला. यानंतर विविध विषयांवरील व्याख्याने झाली. 'ब्राह्मण युवा कसा असावा' या विषयावर माधव घांगुर्डे यांचे व्याख्यान झाले. त्यानंतर 'खगोलशास्त्र, अध्यात्म, आणि पंचांग यांचा परस्पर संबंध' या विषयावर अनंत गंगाखेडकर यांचे व्याख्यान झाले. संतोष नेने यांनी आर्थिक गुंतवणुक या विषयावर व रेवती केतकर यांनी इन्शुरन्स (कॅन्सर सुरक्षा) या विषयावर मार्गदर्शन केले. चंद्रकान्त मंद्रुपकर यांनी करियर निवड व परदेशी शिक्षण या विषयांवर मार्गदर्शन केले. रुग्णमित्र प्रसाद अग्निहोत्री यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन केले. पुढील निवडणुकांमधे ब्राह्मण समाजाने १०० टक्के मतदान करावे असा ठराव या वेळी करण्यात आला. जागतिक कर्करोगदिनानिमित्त या वेळी गरीब कर्कग्रस्त रुग्णांसाठी स्वेच्छानिधीचे संकलन करण्यात आले.


यानंतर काही सांस्कृतिक कार्यक्रम झाले. अॅड. निशांत सप्रे व सृष्टी कुलकर्णी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. चंद्रकांत गोडबोले, राणी देशपांडे, प्राजक्ता दिवेकर, मंदार कुलकर्णी, समृद्ध खरे आदींनी कार्यक्रमाचे उत्तम नियोजन केले.



# तिसरी कसोटी रंगतदार स्थितीत

**शुबमनचे शतक**

## इंग्लंडला ३३२ धावांची, तर भारताला नऊ विकेट्सची गरज



**विशाखापट्टणम : वृत्तसंस्था**

विशाखापट्टणम येथे खेळल्या जात असलेल्या दुसऱ्या कसोटी सामन्यात भारतीय संघाने पहिल्या डावात ३९६ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात इंग्लंडचा संघ केवळ २५३ धावा करू शकला आणि भारताला पहिल्या डावात १४३ धावांची आघाडी मिळाली. यानंतर दुसऱ्या डावात शुबमन गिलच्या शतकामुळे भारताने २५५ धावा केल्या आणि इंग्लंडसमोर विजयासाठी ३९९ धावांचे लक्ष्य आहे.

प्रत्युत्तरात इंग्लंडने तिसऱ्या दिवसअखेर १४ षटकानंतर एक गडी गमावून ६७ धावा केल्या आहेत. इंग्लिश संघाला विजयासाठी अद्याप ३३२ धावांची गरज आहे. त्याचवेळी भारताला विजयासाठी नऊ विकेट्सची गरज आहे. इंग्लंडला एकमेव धक्का बेन डकेटच्या रूपाने बसला. त्याला अश्विनने यष्टिरक्षक भरतच्या हाती झेलबाद केले. बेनला २८ धावा करता आल्या. तिसऱ्या दिवसाचा खेळ संपेपर्यंत जॅक क्रॉली २९ धावा आणि रेहान अहमद नऊ धावांसह खेळत होते.

तिसऱ्या दिवसाची सुरुवात भारताच्या दुसऱ्या डावाने झाली, जेव्हा त्यांनी एकही विकेट न गमावता २८ धावा केल्या. या वेळी यशस्वी जैस्वाल १७ चेंडूत १५ धावा आणि कर्णधार रोहित शर्मा १९ चेंडूत १३ धावांवर खेळत होते. तिसरा दिवस भारतासाठी काही खास नव्हता, कारण त्यांनी तीनही सत्रे न खेळता सर्व १० विकेट्स गमावल्या. या काळात फिरकीपटू टॉम हार्टलीने इंग्लंडकडून सर्वाधिक तीन बळी घेतले, तर भारताकडून शुबमन गिलने शतक झळकावले. त्याने १४७ चेंडूंत ११ चौकार आणि दोन षटकारांच्या मदतीने १०४ धावांची खेळी केली.

दिवसाच्या तिसऱ्या सत्रात टीम इंडियाचा दुसरा डाव २५५ धावांवर आटोपला. दोन्ही डावात फलंदाजी केल्यानंतर भारताने इंग्लंडसमोर ३९९ धावांचे लक्ष्य ठेवले होते. तिसऱ्या दिवसअखेर इंग्लंडने एक गडी गमावून ६७ धावा केल्या आहेत. त्यानंतर उरलेल्या दोन दिवसांत त्यांना विजयासाठी नऊ विकेट्सवर ३३२ धावांची गरज आहे.



## माजी क्रिकेटपटू संजय बांगर यांच्या हस्ते शिवाजीनगर क्रिकेट अकॅडमीचे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या संकल्पनेतून उभारण्यात आलेल्या शिवाजीनगर क्रिकेट अकॅडमीचे उद्घाटन भारताचे माजी क्रिकेटपटू संजय बांगर यांच्या हस्ते रविवारी (दि.४) झाले. या अकॅडमीसाठी लागेल ती मदत करण्याची ग्वाही लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी या वेळी दिली.

क्रिकेटमध्येही गावातील तरुणांनी पुढे जावे या उद्देशाने उलवे रोड सेक्टर १० येथे शिवाजीनगर गावाजवळ अकॅडमीची स्थापना करण्यात आली आहे. प्रामुख्याने माजी क्रिकेटपटू संजय बांगर, एमसीएचे दीपक मोरकर, मनोज लोखंडे यांचे मार्गदर्शन या अकॅडमीत क्रिकेटपटूंना भेटणार आहे.

उद्घाटन समारंभाला भाजपचे पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, पं.स.च्या माजी सदस्य रत्नप्रभा घरत, न्हावे ग्रामपंचायतीचे सरपंच विजेंद्र पाटील, माजी सरपंच हरिश्चंद्र म्हात्रे, गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, कोळी समाजाचे अध्यक्ष विश्वनाथ कोळी, किशोर पाटील, जयवंत देशमुख, सी.एल. ठाकूर, वामन ठाकूर, अमोघ ठाकूर, आदेश ठाकूर, आणि आदेश स्पोर्ट्स कमिटीचे सदस्य आणि क्रिकेटप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## डोंबिवलीतील नमो चषकाचा आमदार रमेश पाटील यांच्या हस्ते शुभारंभ



**नवी मुंबई : बातमीदार**

भारतीय जनता पक्ष युवा मोर्चा व उत्तर भारतीय मोर्चा यांच्या वतीने डोंबिवली येथे आयोजित करण्यात आलेल्या नमो चषक २०२४चा शुभारंभ आमदार रमेश पाटील यांच्या हस्ते झाला. या वेळी बोलताना त्यांनी डोंबिवली व परिसरातील खेळाडूंना नमो चषकच्या माध्यमातून उत्तम व्यासपीठ निर्माण झाले असून त्यांच्या कलागुणांना वाव मिळणार असल्याचे सांगितले.

शुभारंभावेळी भाजप डोंबिवली ग्रामीण जिल्हाध्यक्ष सूर्यकांत मालकर, उत्तर भारतीय मोर्चा जिल्हाध्यक्ष नागेंद्र शर्मा, मच्छीमार सेल प्रदेशाध्यक्ष ॲड. चेतन पाटील, उपाध्यक्ष रवी ठाकूर, उत्तर भारतीय मोर्चा महासचिव देवी शंकर शुक्ला, राजन पांडे, युवा मोर्चा कल्याण ग्रामीण विधानसभा अध्यक्ष अमित चिकनकर, कल्याण ग्रामीण विधानसभा नमो चषक संयोजक सचिन गायकर, सारिका मिश्रा यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

महाराष्ट्रातील युवकांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली युवा मोर्चाच्या वतीने नमो चषक २०२४चे आयोजन राज्यभरात करण्यात आले आहे. या क्रीडा व कला महोत्सवाच्या माध्यमातून खेळाडू, कलाकारांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा संकल्प केला गेला आहे. याच अनुषंगाने सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली डोंबिवली रेयान इंटरनॅशनल स्कूल येथे नमो चषक २०२४ चे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये विविध स्पर्धांचा समावेश असून हजारो खेळाडूंनी उत्स्फूर्तपणे भाग घेतला आहे.

आमदार पाटील यांच्या हस्ते यशस्वी खेळाडूंना मेडल व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. या वेळी त्यांनी २०१४ साली पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात केंद्रामध्ये भाजपचे सरकार आल्यानंतर सर्व क्षेत्रात आमूलाग्र व सकारात्मक बदल घडल्याचे सांगितले.

## आमदार महेंद्र दळवी यांच्या हस्ते शुटींगबॉल स्पर्धेचे उद्घाटन

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील नारंगी येथे आमदार चषक राज्यस्तरीय शुटींगबॉल स्पर्धेचे उद्घाटन आमदार महेंद्र दळवी यांच्या हस्ते झाले. या वेळी त्यांनी, खारेपाटासह अलिबाग तालुक्यातील सर्व खेळाडूंकरिता अलिबागमध्ये स्टेडियम तयार करणार असून विशेषत: पावसाळी खेळ कबड्डी, शुटींगबॉल, कुस्ती या स्टेडियममध्ये खेळता येतील, असे म्हटले.

या वेळी शिवसेना तालुका उपाध्यक्ष डॉ. जगन्नाथ पाटील, वरुण पाटील, संदेश थळे, नंदन पाटील, विशाल जुईकर, डॉ. संदेश पटील, गिरीष पाटील, सनील मोकल, नारंगी सरपंच उदय म्हात्रे, शिरवली सरपंच प्रणिकेत म्हात्रे, उपविभाग प्रमुख राहुल पाटील, सामाजिक कार्यकर्ते शंकर मोकल, ॲड. प्रथमेश पाटील, सल्लागार सुनील म्हात्रे, जगन्नाथ पाटील, विकास गावंड, विजय गावंड, कमलाकर पाटील, रोहित पाटील, राजेश म्हात्रे, राजेंद्र म्हात्रे, केतन म्हात्रे, दिप्ती पाटील, बबन पाटील, पांडुशेठ म्हात्रे, ज्ञानेश्वर पाटील, संदेश म्हात्रे, नरहरी म्हात्रे, हरिश्चंद्र म्हात्रे, संदीप पाटील, संजय पाटील, गिरिष कडवे, मनोहर पाटील आदी उपस्थित होते.

## नागोठणे मुरावाडी येथे सीएम चषक क्रिकेट स्पर्धा

**पाली : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून नागोठणे मुरावाडी येथे ९, १०, ११ फेब्रुवारी रोजी सीएम चषक क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. जय बजरंग क्रिकेट क्लबकडून या स्पर्धेच्या आयोजनाची मागील दोन महिन्यांपासून जोरदार तयारी सुरू आहे.

शिवसेनेचे नागोठणे विभागप्रमुख प्रवीण ताडकर यांच्या नेतृत्वाखाली खेळाडू सहकारी आणि मुरावाडी ग्रामस्थ यांच्या सहकार्याने ही भव्य स्पर्धा होणार आहे. या स्पर्धेत रायगड जिल्ह्यासह राज्यातील नामवंत खेळाडूंचा खेळ पाहता येणार आहे. स्पर्धेसाठी लाखो रुपयांची बक्षिसे, आकर्षक चषक, उत्तेजनार्थ पारितोषिक आहे.








**पनवेल : आदर्श मित्र मंडळ, संजीवनी मित्र मंडळ आणि स्व. चिराग ठोंबरे प्रतिष्ठानच्या वतीने परेश घरत आणि विशाल जितेकर यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली नवीन पनवेल येथे दोन दिवसीय क्रिकेट प्रीमियर लीगचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेला महापालिकेचे माजी सभागृह परेश ठाकूर यांनी भेट दिली. या वेळी माजी नगरसेवक तेजस कांडपिळे उपस्थित होते.**

## सचिन तेंडुलकरकडून शुबमन गिलचे कौतुक

**मुंबई : प्रतिनिधी**

भारत आणि इंग्लंड यांच्यात विशाखापट्टणम येथे दुसरा कसोटी सामना खेळला जात आहे. या सामन्यात भारतीय संघाने दुसऱ्या डावात शुबमन गिलच्या शतकाच्या जोरावर २५५ धावा केल्या. त्याचबरोबर इंग्लंडसमोर ३९९ धावांचे लक्ष्य ठेवले. दरम्यान, दुसऱ्या डावात शतक झळकवणाऱ्या शुबमनचे क्रिकेटचा देव सचिन तेंडुलकरने सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर करून कौतुक केले.

शुबमन गिलने पहिल्या डावात ३४ धावा केल्या होत्या. त्यामुळे त्याच्यावर टीका केली जात होते तसेच त्याला संघातून बाहेर करावे, अशी मागणी जोर धरत होती, मात्र या सामन्याच्या दुसऱ्या डावात त्याने संयमाने फलंदाजी करीत शतक झळकावले. यानंतर सचिन तेंडुलकरने एक्सवरून गिलच्या शतकाचे कौतुक केले. सचिन तेंडुलकरने लिहिले, 'शुबमन गिलची ही खेळी कौशल्याने परिपूर्ण होती, त्याने योग्य वेळी शतक झळकावल्याबद्दल अभिनंदन.'

तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या शुबमन गिलसाठी 'करो या मरो' अशी स्थिती होती, पण शुबमन गिलने संयमाने फलंदाजी करत १३२ चेंडूंत शतक झळकावले आणि भारताचा दुसरा डाव सावरला. त्याने आपल्या खेळीत ११ चौकार आणि दोन षटकार मारले. हे शुबमन गिलच्या कसोटी कारकीर्दीतील तिसरे शतक ठरले. शुबमनने यापूर्वी मार्च २०२३मध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध शतक झळकावले होते.










दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com